कृषीवल
रायगड, बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५
किंमत ४ ₹

## आज कर्नाळा अभयारण्य बंद

पनवेल : नव वर्षाच्या स्वागता करिता अनेकजण रायगड जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळी भेट देत आहेत. त्यातच मुंबई-गोवा महामार्गावर असलेले कर्नाळा पक्षी अभयारण्याला देखील पर्यटक मोठ्या प्रमाणात भेटी देत आहेत. यंदा १ जानेवारी ते २८ डिसेंबर या कालावधीत एकूण ८२,४५५ प्रौढ, ६,७८४ मुले आणि १७४ विदेशी पौढ व २ मुलांनी कर्नाळा अभयारण्याला भेटी दिल्या आहेत. नवी मुंबई व पनवेल जवळ असलेले हे प्रसिद्ध अभयारण्य सध्या निसर्गप्रेमी, पर्यटक आणि पक्षी निरीक्षकांचे आवडते ठिकाण ठरत आहे. येथील हिरवीगार वनसृष्टी, शांत वातावरण आणि विविध प्रकारच्यापक्ष्यांमुळे कर्नाळा अभयारण्य पर्यावरण पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे. या अभयारण्यात २०० हून अधिक पक्षी प्रजाती आढळतात. तसेच, अभयारण्याच्या मध्यभागी असलेला ऐतिहासिक कर्नाळा किल्ला ट्रेकर्ससाठी आकर्षण ठरत असून पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत आहेत. मात्र, यंदा मोठ्या प्रमाणात पर्यटकांनी जरी भेटी दिल्या असल्या तरीदेखील बुधवारी (दि.३१) कर्नाळा अभयारण्य बंद राहणार आहे.

# मागे वळून पाहताना...

आठवणी, घडामोडी, संघर्ष आणि बदलांनी भरलेलं २०२५ वर्ष आज इतिहासजमा होत आहे. राजकारणापासून विकासकामांपर्यंत, यश-अपयशाच्या पायवाटा ओलांडत हे वर्ष अनेक प्रश्न, धडे आणि अपेक्षा देऊन निरोप घेत आहे. काही वचनं पूर्ण झाली, काही अजूनही प्रतीक्षेत राहिली; तर काही घटनांनी संपूर्ण व्यवस्थेलाच आरसा दाखवला.

३१ डिसेंबर... कॅलेंडरचे पान बदलता बदलता संपूर्ण कॅलेंडरच बदलायचा दिवस आला. घड्याळातील काटा आणखी पुढे गेला आणि तुमच्या-आमच्या आयुष्यातील आणखी एक वर्ष सरत आले. हे वर्ष सरता सरता रायगड जिल्ह्यावरच नव्हे तर देशावर मळभ घेऊन आले होते. मोदी सरकारची महागाई, महिलांवरील अत्याचार, मुलींच्या जन्मात घट, दरोडे, चोऱ्या, अपघात अशा एक ना अनेक कारणामुळे हे वर्ष प्रत्येकाच्या चांगलेच लक्षात राहिले आहे. देशावरचे हे मळभ मन व्यथित करून सोडणारे तर आहेच; पण त्याचबरोबर सर्वांच्याच मनावर एक भळभळणारी जखम करणारे आहे. जिल्ह्यात येऊ पाहत असलेल्या प्रकल्पांमुळे आलेल्या जिल्ह्याच्या श्रीमंतीबरोबरच आपण विचारांची श्रीमंती मात्र हरवून बसलो आहोत. आता येणारे वर्ष तरी मोकळे आकाश घेऊन येईल का, हा सवाल आता प्रत्येकाच्या डोळ्यात दिसून येत आहे. केवळ विनयभंग किंवा बलात्काराच्या व्रण मनावर कोरलेल्या त्या अभागी युवतींसाठीच नव्हे, तर बऱ्याच महिलांसाठीही हे वर्ष काळजावर दगड ठेवून गेले. आणि म्हणूनच सरत्या वर्षात घडलेल्या अमानुष घटनांना मागे सोडून येत्या वर्षाचा विचार करुया. तसेच, समाजातील हरवलेला संवाद पुन्हा शोधण्याची गरज आहे. यावर विचार करुया आणि नव्या वर्षाला सामोरे जाताना निकोप सामाजिक संबंध निर्माण करण्याची प्रतिज्ञा करुया. मागे वळून पाहताना, २०२५ हे केवळ एक वर्ष नव्हे, तर समाज, प्रशासन आणि जनतेच्या संयमाची कसोटी पाहणारा काळ ठरला. आता या अनुभवांच्या ओझ्यावरून नव्या वर्षाकडे वाटचाल करताना, अपेक्षा एकच आहे, उद्याचा दिवस आजपेक्षा अधिक पारदर्शक, गतिमान आणि विश्वासार्ह असावा.

**२०२५ हे वर्ष राजकारण, प्रशासन, अर्थकारण, समाज आणि तंत्रज्ञान अशा अनेक पातळ्यांवर घडामोडींनी गाजले. काही निर्णयांनी दिशा बदलली, काही वादांनी व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे केले, तर काही घटनांनी जनतेच्या अपेक्षा अधिक ठळक केल्या.**

**राजकीय घडामोडी**
- स्थानिक स्वराज्य संस्था व विविध निवडणुकांमुळे राजकीय वातावरण तापलेले राहिले.
- सत्तांतर, आघाड्या आणि आरोप-प्रत्यारोप यामुळे वर्षभर राजकारण चर्चेत.
- विरोधकांचा आक्रमक पवित्रा आणि सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवरून वाद.

**विकास व प्रशासन**
- रस्ते, पाणीपुरवठा, जलजीवन मिशनसारख्या योजनांबाबत कामांची संथ गती चर्चेचा विषय.
- डेडलाईन ओलांडूनही अपूर्ण प्रकल्पांमुळे नागरिकांमध्ये नाराजी.
- काही ठिकाणी मोठ्या पायाभूत प्रकल्पांना गती मिळाल्याचे चित्रही दिसले.

**अर्थकारण**
- महागाई, इंधन दरवाढ आणि सामान्यांच्या खिशावर वाढलेला ताण.
- शेअर बाजारात चढ-उतार; काही गुंतवणूकदारांना फायदा, तर काहींना तोटा.
- रोजगार आणि उत्पन्नवाढ हा कळीचा मुद्दा ठरला.

**सामाजिक घडामोडी**
- शेतकरी, कर्मचारी, विविध संघटनांचे आंदोलन वर्षभर सुरू.
- शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सुविधांवरून सरकारवर टीका.
- सोशल मीडियाचा प्रभाव अधिक वाढला; व्हायरल व्हिडिओंनी अनेकदा वातावरण ढवळून काढले.

**कायदा-सुव्यवस्था व सुरक्षा**
- भ्रष्टाचाराचे आरोप, चौकशा आणि कारवाया चर्चेत.
- काही संवेदनशील प्रकरणांनी कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले.


(छायाचित्र : सुधीर नाझरे)

# जिल्ह्यात ४६ ठिकाणी डिजे नाईट

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

सरत्या २०२५ या वर्षाला निरोप देत असताना नव्या २०२६ वर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटक, हॉटेल व्यावसायिक स झाले आहेत. यावेळी वेगवेगळ्या हॉटेलमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली आहे. विविध पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले आहे. काहीजण मित्रमंडळीं तर काहीजण त्यांच्या नातेवाईकांसोबत साजरे करणार आहेत. यावर्षी थर्टीफर्स्ट म्हणजे ३१ डिसेंबर बुधवारी आला आहे. त्यामुळे जिल्ह्यात जल्लोषात थर्टी फर्स्ट साजरा होणार आहे. या निमित्ताने जिल्ह्यामध्ये ४६ ठिकाणी पार्ट्या होणार असून राज्य उत्पादन शुल्क विभागाने एक दिवसाचा मद्य विक्रीचा परवाना या पार्ट्यांमध्ये दिला आहे. मात्र, परवानगी न घेता मद्य विक्री केल्यास त्यांच्याविरोधात कारवाई केली जाणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क रायगड विभागाचे अधीक्षक रविंद्र कोले यांनी दिली.

नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी यंदाही पर्यटकांनी रायगडला पसंती दर्शविली. थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी पर्यटकांसह स्थानिकांनी तयारी केली आहे. वेगवेगळ्या हॉटेल, रेस्टॉरन्टमध्ये वेगवेगळ्या सवलती ठेवण्यात आल्या आहेत. रोषणाई करण्यात आली आहे. थर्टी फर्स्ट निमित्त वेगवेगळ्या ठिकाणी पार्टींचे आयोजन केले आहे. गीत गायनांसह वेगवेगळ्या मैफिली होणार आहेत. वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम साजरे होत असताना मद्यपींसाठीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे. मद्य विक्रीसाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून परवानगी घेण्यात आली आहे. आलेल्या अर्जांची पडताळणी करून उत्पादन शुल्क विभागाने ४६ जणांना परवानगी दिली आहे. त्यामुळे जिल्ह्यात ४६ ठिकाणी पार्टी होणार आहेत. सरत्या वर्षाला निरोप देण्याचा क्रेझ शहरी भागासह ग्रामीण भागातदेखील वाढू लागला आहे. गावागावात त्याची तयारी करण्यात आली. शेतांसह फार्महाऊसमध्ये वेगवेगळे उपक्रम राबवून हा दिवस जल्लोषात साजरा करण्यासाठी नागरिक सज्ज झाले आहेत. काहीजण कोकणातील वैशिष्टयपूर्ण खाद्य पदार्थाचा प्रकार असलेल्या पोपटी खाण्याचा आनंददेखील लुटणार आहेत. गेल्या पंधरा दिवसांपासून ही तयारी सुरु होती. काही जण गावात, काहींनी गावांतील शेतांमध्ये एकत्र येऊन नव्या वर्षाचा आनंद उत्सव साजरा करणार आहेत. पूर्वी वर्षपूर्ती साजरी करण्याचे वेड फक्त मोठ्या शहरांपूरता होते. आता मात्र ते वेड गावागावात होणार आहे. नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी गावांतील रस्त्यांवर आकर्षक सजावट केली जाणार आहे. फटांक्यांची आतषबाजी होणार आहेत.

## टॅक्सी, ऑटो रिक्षाचे भाडेदर जाहीर

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अंतरानुसार भाडे व प्रोत्साहन टक्केवारी निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना पारदर्शक आणि निश्चित दरांचा लाभ मिळणार आहे. तर, प्रिपेड ऑटोरिक्षा सेवेसाठी सुधारित मूलभूत ऑटोरिक्षा भाडे दर रु. १७.१४ प्रति किलोमीटर गृहीत धरून अंतरानुसार भाडे व प्रोत्साहन टक्केवारी ठरविण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी व प्रवाशी वाहतूक होणाऱ्या विमानतळ, रेल्वे स्थानक, बस स्थानक इत्यादी ठिकाणी प्रवाशांच्या सोयीसाठी रिक्षा व टॅक्सी थांबे असणे गरजेचे आहे. या नव्या भाडेदरांमुळे विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पारदर्शक आणि निश्चित दरांचा लाभ मिळणार असल्याचे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी सांगितले आहे.

## खांदेरी दुर्गावर विजय दिनाचे आयोजन

| अलिबाग | प्रतिनिधी |

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला आणि नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आलेला खांदेरी दुर्ग हा स्वराज्याच्या सागरी इतिहासातील एक महत्त्वाचा साक्षीदार आहे. ३१ डिसेंबर १६७९ रोजी या दुर्गावर स्वराज्याच्या आरमाराचा भगवा झेंडा अभिमानाने फडकविला गेला होता. त्यामुळे या ऐतिहासिक विजय दिनाचे औचित्य साधून बुधवारी (दि.३१) खांदेरी दुर्गावर ऐतिहासिक विजय दिन साजरा करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम थळ बाजार जेट्टी येथील खांदेरी दुर्ग समोरील किनाऱ्यावरील खुबलढा बुरुज येथे सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमातून खांदेरी दुर्गाचे स्वराज्यासाठी असलेले रणनीतिक महत्त्व, छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी आणि मराठा आरमाराचा पराक्रम नागरिकांसमोर मांडण्यात येणार आहे.



या कार्यक्रमात सुप्रसिद्ध शिवव्याख्याते तसेच खांदेरी दुर्गावरील वाघबकरी या बैठ्या खेळांचे संशोधक पंकज भोसले हे खांदेरी दुर्गाचा गौरवशाली इतिहास उलगडून सांगणार आहेत. त्यासोबतच उपस्थितांना स्वराज्यकालीन शस्त्रांची माहिती मिळावी यासाठी छोटेखानी ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून स्वराज्याच्या आरमाराला बळ देणाऱ्या सरखेल कान्होजी आंग्रे यांचे वंशज रघुजीराजे आंग्रे उपस्थित राहणार आहेत. नववर्ष स्वागताच्या झगमगाटात हरवून जाणाऱ्या या ऐतिहासिक विजय दिनाची आठवण पान २ वर

## जड-अवजड वाहनांना बंदी

**कोंडीबरोबरच अपघात रोखण्यासाठी अधिसूचना जारी**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

थर्टी फस्ट साजरा करण्यासाठी रायगड जिल्ह्यात लाखोच्या संख्येने पर्यटक येणार आहेत. पर्यटकांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा यासाठी जिल्हा प्रशासनाने दोन दिवस अवजड वाहनांना बंदी घातली आहे. बुधवार दि.३१ डिसेंबर रोजी सकाळी आठ ते गुरुवार दि.१ जानेवारी रोजी रात्री बारा वाजेपर्यंत ही बंदी राहणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

रायगड जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. २०२५ या वर्षाला निरोप व २०२६ या नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पर्यटक मांडवा, किहीम, अलिबाग, आक्षी, नागाव, रेवदंडा, काशिद, मुरूड, दिवेआगर, श्रीवर्धन, महाड या पर्यटन स्थळी मोठ्या प्रमाणात येणार आहेत. काही पर्यटक निघाले असून काही पर्यटक जिल्ह्यात दाखल झाले आहेत. दरम्यान, राष्ट्रीय व राज्य महामार्ग तसेच शहरामध्ये पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असून या महामार्गांवरील जड-अवजड वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत आहे. त्यात वडखळ-अलिबाग हा एकेरी रस्ता आहे. तसेच, अलिबाग-रेवस व अलिबाग-रेवदंडा-मुरूड हे रस्ते अरूंद आहेत. या मार्गावरून पर्यटकांची प्रचंड प्रमाणात येणारी व जाणारी वाहने व त्याच वेळी होणारी डंपर, ट्रक व इतर जड-अवजड वाहनांची वाहतूक यामुळे कोंडी होण्याची तसेच अपघात होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक व पर्यटकांचा प्रवास सुखकर होण्याच्या दृष्टीने थर्टी फर्स्ट निमित्त उपाययोजना पान २ वर



### जीवनाश्यक वस्तू नेणारी वाहने सुरू

मांडवा, किहीम, अलिबाग, आक्षी, नागाव, रेवदंडा, काशिद, मुरूड, दिवेआगर, श्रीवर्धन, महाड, कर्जत, माथेरान, खालापूर, इर्मजिका, पाली, महड, रायगड किल्ला अशा पर्यटन स्थळी मोठ्या प्रमाणात पर्यटक त्यांची वाहने घेऊन रायगडमध्ये येण्याची शक्यता आहे. वेगवेगळ्या समुद्र किनाऱ्यांना भेटी देणार आहेत. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच शहरामध्ये पर्यटकांची मोठ्या प्रमाणात रेलचेल असून त्यातच महामार्गावरील जड-अवजड वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत आहे. ही वाहतूक बंदी दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला, पाणी इत्यादी जीवनाश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने, रुग्णवाहिकांना लागू राहणार नाही, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## भांडुपमध्ये बसने चौघांना चिरडले

| भांडुप | प्रतिनिधी |

भांडुप पश्चिमेकडील रेल्वे स्टेशन रोडवर सोमवारी (दि.२९) रात्री थरकाप उडवणारी दुर्घटना घडली. बेस्ट बस रिव्हर्स घेताना चालकाचे नियंत्रण सुटून झालेल्या अपघातात चौघांचा जागीच मृत्यू झाला, तर नऊजण जखमी झाले आहेत. जखमींवर राजावाडी व अन्य एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

भांडुप रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडील बाजूस रेल्वे, बस व रिक्षा प्रवाशांची सतत ये-जा सुरू असते. त्याशिवाय बाजार असल्यामुळे इतर रहिवाशांचीही मोठी गर्दी असते. अशा गर्दीच्या वेळी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास नेहमीप्रमाणे तिथे आलेली बस मागे घेत असताना चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे बस अत्यंत वेगात मागे आली. त्याखाली अनेक लोक चिरडले गेले. या घटनेमुळे स्टेशन परिसरात आरडाओरडा आणि घबराट उडाली. या अपघातात तीन महिला व एका पुरूषाचा जागीच मृत्यू झाला. तर, एका महिलेसह आठ पुरुष गंभीर जखमी झाले आहेत. या सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मागील वर्षी कुर्ला येथील एसजी बर्वे मार्गावर असाच अपघात झाला होता. त्यावेळी बेस्ट बसने अनेक पादचारी व २२ वाहनांना उडवले होते. त्यात नऊजणांचा मृत्यू झाला होता, तर ४२ जण जखमी झाले होते. भांडुपमधील घटनेमुळे त्या भयानक अपघाताच्या आठवणी ताज्या झाल्या.

**२०२५ ग्लोबल विजेता | नासा इंटरनॅशनलस्पेस चॅलेंज**

## प्रतीक जाधवची अवकाशाला गवसणी

| पाली /बेणसे | प्रतिनिधी |





सुधागड-पाली येथील प्रतीक जाधव याने स्वीपर संघाचे दमदारपणे नेतृत्व करून नासाच्या जागतिक इव्हेंटमध्ये अवकाशाला गवसणी घालणारी कामगिरी केली आहे. त्याच्या या कृतीने रायगड जिल्ह्याचे नाव जगभरात लौकिक झाले असून सुधागड-पालीच्या शिरपेचात देखील मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या स्पर्धेत १८,८६० संघाचा सहभाग असून १६७ देशातील १,१४,०९४ स्पर्धक सहभागी झाले होते. भारतातील इस्त्रोसह १४ स्पेस एजन्सी पार्टनर असून यात प्रतीक जाधवच्या ॲस्ट्रो स्विपर्स संघाने '२०२५ ग्लोबल विजेता' असे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जिंकले. त्यामधून ग्लोबल टॉप १० संघाची निवड करण्यात आली. त्यातून प्रथम क्रमांकाचा भारतीय इनोव्हेटरच्या ॲस्ट्रो स्वीपर्स संघाने 'गॅलॅक्टिक इम्पेक्ट' विजेतेपद पटकावले आहे. नासा इंटरनॅशनलस्पेस चॅलेंज हा जगातील सर्वात मोठ्या नाविन्यपूर्ण हॅकेथॉन पैकी एक आहे. 'गॅलॅक्टिक इम्पेक्ट' हा पुरस्कार जागतिकस्थरावर मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल घडवून आणू शकतात, अशा संघाला दिला जातो. या पुरस्काराचे मानकरी प्रतीक जाधव व त्यांचा संघ ठरला आहे. या संघाने 'ॲस्ट्रो स्वीपर रिस्क इंडेक्स' नावाचा एक समग्र स्कोरिंग फ्रेम वर्क विकसित केला आहे. प्रतीकने भारताचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविल्याने त्याच्यासह ॲस्ट्रो स्वीपर संघाचे कौतुक होत आहे.

## महादेव वाघमारे यांचा अर्ज दाखल



पनवेल : पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १५ मधील राजकीय वातावरण तापू लागले आहे. यादरम्यान, शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल जिल्हा कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांनी मंगळवारी (दि.३०) 'अ' प्रभागातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी काँग्रेसच्या नेत्या श्रुती म्हात्रे या देखील उपस्थित होत्या. महादेव वाघमारे हे शेकापक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष तसेच पक्ष प्रवक्ते म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.

## तिकीट नाकारल्याने भाजपा माजी नगरसेवकांची बंडखोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

**■ खारघर प्रभाग क्रमांक ६ आणि ४ मध्ये बंडखोरांनी दाखल केले अर्ज**

बंडखोरी टाळण्यासाठी भारतीय जनता पार्टीकडून एन वेळी एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले होते. तरी सुद्धा भाजपाकडून तिकीट नकरण्यात आलेल्या माजी नगरसेवकांनी बंडखोरी केली असून खारघर वसाहतीमधील प्रभाग क्रमांक ४ आणि ६ मधील माजी नगरसेवकांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. उमेदवारी दाखल करणाऱ्यांमध्ये प्रभाग क्रमांक ६ मधील नेत्रा पाटील यांचा समावेश असून, त्यांचे पती किरण पाटील यांनी देखील अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. पाटील यांच्या प्रमाणेच प्रभाग क्रमांक ६ मधील माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांना देखील पक्षांकडून तिकिट नकरण्यात आले आहे. त्यामुळे बाविस्कर यांनी देखील अपक्ष अर्ज दाखल केला आहे. तसेच, प्रभाग क्रमांक ४ मध्ये एका दिवसापूर्वी कॉलनी फोरममधून पक्षात प्रवेश केलेल्या मधू पाटील यांना उमेदवारी दिल्याने अभिमन्यू पाटील नाराज असल्याचे सांगण्यात येत आहे. भाजपाकडून कामोठे वसाहती मधील माजी नगरसेवक गोपीनाथ पाटील आणि आरोग्य सभापती पद भूषवलेले डॉक्टर अरुणकुमार भगत यांचे तिकिट देखील कापले पान २ वर

# पनवेलमध्ये चारशे उमेदवारी अर्ज दाखल

## • शेवटच्या दिवशी ३७१ उमेदवारांची धावपळ; सर्व पक्षीयांचे शक्ती प्रदर्शन



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेच्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी २० प्रभागातील ७८ जगांसाठी एकूण ४०० उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी मंगळवारी (दि.३०) विविध पक्षांतील तसेच अपक्ष म्हणून ३७१ जणांनी आपली उमेदवारी दाखल केली आहे.

पनवेल पालिकेसाठी १५ जानेवारी रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडणार असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दि.२३ ते ३० डिसेंबर पर्यंतचा अवधी देण्यात आला होता. पहिल्या दिवसांपासून अर्ज दाखल होणे अपेक्षित असताना पक्षातील बंडाली टाळण्यासाठी तसेच जागा वाटपातील तिढा न सुटल्याने सर्वच राजकीय पक्षांकडून उमेदवारी अर्ज दाखल करणे टाळण्यात आले होते. यावेळी महाविकास आघाडी व महायुतीतील घटक पक्षांच्या अधिकृतच उमेदवारांसोबतच अपक्ष उमेदवारांनी मंगळवारी नियोजित वेळापत्रकानुसार आपले उमेदवारी अर्ज शक्ती प्रदर्शनाने दाखल केले. प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, ३० डिसेंबर ही अर्ज दाखल करण्यासाठी शेवटची मुदत असताना देखील २९ डिसेंबरपर्यंत २० प्रभागातून केवळ २९ अर्ज दाखल करण्यात आले होते. मात्र, ३० डिसेंबर या शेवटच्या दिवशी तब्बल ३७१ अर्ज दाखल करण्यात आल्याने उमेदवारी अर्ज दाखल केलेल्यांची संख्या ४०० इतकी झाली आहे.

यामध्ये मंगळवारी निवडणूक कार्यालय नावडे १ प्रभाग १,२ आणि ३ मध्ये एकूण ७६ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले. निवडणूक कार्यालय २ 'अ' खारघर प्रभाग ४,५,६ येथे एकूण ५२ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले. निवडणूक कार्यालय ३ 'ब' कळंबोली प्रभाग ७, ८, ९, १० येथे एकूण ७७ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले आहेत.निवडणूक कार्यालय ४ 'क' कामोठे प्रभाग ११, १२, १३ येथे एकूण ६० नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले. निवडणूक कार्यालय ५ 'ड' पनवेल १ प्रभाग १४, १५, १६ येथे एकूण ५२ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले. निवडणूक कार्यालय ६ 'ड' पनवेल २ प्रभाग १७, १८, १९, २० येथे एकूण ५४ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले आहेत.

या नामनिर्देशन पत्रांची छाननी बुधवारी (दि.३१) सकाळी ११ वाजल्यापासून सुरू होणार आहे. वैधरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी छाननीनंतर प्रसिद्ध केली जाणार आहे. तसेच, उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक शुक्रवार दि.२ जानेवारी असून, सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली आहे. तर, शनिवार दि. ३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार असून, त्याच दिवशी अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जातणार आहे.

### कार्यकर्त्यांची मोठी गर्दी

अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने सर्वच राजकीय पक्षातील उमेदवारांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी प्रभाग कार्यालयाबाहेर प्रचंड गर्दी केली होती. यामध्ये महिला कार्यकर्त्यांची संख्या लक्षनीय होती. कार्यकर्त्यांना कोणतीही अडचण होऊ नये या करीता उमेदवारांकडून अत्यावश्यक सोयी करण्यात आली होती.

### धावत पळत गाठले कार्यालय

अर्ज दाखल करण्यासाठी दुपारी ३ पर्यंतची वेळ निश्चित करण्यात आली होती. याची माहिती असून देखील अनेक उमेदवारांनी मिरवणूकी द्वारे अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला. मिरवणुकीत वेळ गेल्याने अनेक उमेदवारांना वेळ संपायला काही मिनिट उरलेली असताना धावत पळत कार्यालय गाठावे लागले.



# राजेंद्र मेहता यांचा अर्धशतकी प्रवास

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

पाली शहरातील एकमेव वृत्तपत्र विक्रेते म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र मेहता गेली ५० वर्षे अखंडपणे वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय करत आहेत. बदलत्या काळात अनेक अडचणींना सामोरे जात त्यांनी हा व्यवसाय निष्ठेने आणि चिकाटीने सुरू ठेवला आहे.

वृत्तपत्र विक्रीच्या सुरुवातीच्या काळातील अडचणी अनेक उदाहरणांद्वारे स्पष्ट केल्या. आज ज्या प्रकारे सर्व सुविधा उपलब्ध आहेत, त्या पूर्वी नव्हत्या. वृत्तपत्र वेळेवर पोहोचवणे, पावसात कागद सांभाळणे, वेळेवर वितरण करणे हे खूप कठीण होते, असे त्यांनी नमूद केले. तसेच, आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियामुळे लोकांना मोबाईलवरच विविध वृत्तपत्रे वाचता येतात. त्यामुळे वृत्तपत्र विक्रीवर परिणाम झाला आहे. तरी आजही अनेक वाचक सकाळीच मराठी, हिंदी किंवा इंग्रजी वृत्तपत्र हातात घेऊन वाचण्याला प्राधान्य देतात. त्यांच्यासाठी आम्ही आजही तेच काम तितक्याच निष्ठेने करत आहोत, असे देखील त्यांनी सांगितले.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी पार्किंगचा अभाव



**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

नाताळची सुट्टी सुरू झाल्यापासूनच श्रीवर्धन तालुक्यात पर्यटकांचा ओघ मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. परंतु, या वाढत्या पर्यटनामुळे प्रत्येक मार्गावरती होणारी वाहतूक कोंडी ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर पार्किंगसाठी जागा अपुरी असल्यामुळे पर्यटक आपल्या गाड्या विविध पाखाड्यांमध्ये उभ्या करून ठेवत आहेत. दाबक पाखाडी, भैरवनाथ पाखाडी, चौकर पाखाडी, वेताळ पाखाडी या परिसरामध्ये नागरिकांच्या घरासमोरील प्रवेशद्वारासमोरच पर्यटक गाड्या उभा करून समुद्रकिनाऱ्यावर निघून जात आहेत. पोलिसांनी पार्किंगची तातडीची व्यवस्था म्हणून श्रीवर्धन येथील र.ना. राऊत विद्यालयाच्या मागील बाजूस असलेले पटांगण ज्या ठिकाणी चर खोदून बंद करण्यात आले होते, ते तात्पुरत्या स्वरूपात चालू करून घेतल्यामुळे काही प्रमाणात वाहतूक कोंडी पासून श्रीवर्धन वासियांना दिलासा मिळाला आहे.

### ■ प्रशासनाचा नियोजन शून्य कारभार

श्रीवर्धन नगरपरिषदेकडून शहराच्या प्रवेशद्वारावर पर्यटकांकडून पर्यटन कर घेतला जातो. परंतु, या पर्यटन कराच्या मोबदल्यात येणाऱ्या पर्यटकांना पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देणे हे नगरपरिषदेचे काम आहे. त्याचप्रमाणे श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमी जवळ असलेले अवधूत मंदिर, त्या ठिकाणी उभ्या राहणाऱ्या बसेस व त्या ठिकाणी बनवण्यात येणारे जेवण यामुळे जागृत अवधूत मंदिर परिसर दिवसेंदिवस विद्रूप करून टाकण्यात येत आहे. वास्तविक पाहता नगरपरिषदेने त्या ठिकाणी सूचनाफलक लावून उघड्यावरती जेवण बनवण्यास सक्त मनाई आहे. अशा आशयाचे सूचनाफलक लावणे आवश्यक आहे. तसेच, श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधारा दांडा विभागाच्या ज्या दिशेला संपतो, त्या ठिकाणी हेलिपॅड बांधण्यात आलेले आहे. या शासकीय विश्रामगृहाच्या बाजूने असलेल्या जागेतून हेलिपॅडपर्यंत जर का पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली तर पर्यटकांच्या शेकडो गाड्या त्या ठिकाणी सुरक्षितपणे उभ्या करता येतील. तसेच, यापासून नगरपरिषदेला देखील उत्पन्न मिळेल.

# डॉ. हेमंत कडू यांना संमोहन रत्न पुरस्कार




**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील नवघर गावचे डॉ. हेमंत कडू यांना 'ग्लोरी अचीव्हमेंट पुरस्कार सोहळा २०२५' या गौरवपूर्ण कार्यक्रमात 'संमोहन रत्न' पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक त्याचप्रमाणे उत्तम असे कार्य करणाऱ्या अनेक व्यक्तींना संमोहन तज्ज्ञ डॉ. विजय कुमार काळे आणि डॉ. रविकुमार काळे यांनी पुरस्कार प्रदान केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.अरूण अडसूळ यांच्यासह पोलीस निरिक्षक श्रीशैल चिवडशेट्टी, पोलीस निरिक्षक निलेश माने, सुमित सुनावणे, आरती गव्हाळे-शेंडगे, ॲड. राहूल सोनवणे आदी उपस्थित होते. यावेळी डॉ.हेमंत कडू यांच्यासह आशा शिरतोडे, रूपाली झारगड, योगेश नालंदे, डॉ.पुजा साळूंखे, प्रथमेश मिशाळ, प्रताप वाघमोडे, पुजा शेंदरकर, दिपक काळे, रेणुका राठोर, अनिकेत इनामके, अक्षय माने, किरण पवार, दिपक जाधव, दिपाली निंबाळकर, रविंद्र चव्हाण, समीर बनकर, अक्षय मांडगे, संतोष जगदाडे, संगीता वाघ, डॉ.स्नेहल निंबाळकर, डॉ.स्नेहल टेकाळे, मनिषा लहाने व मनोज वाबळे इत्यादींना त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार देण्यात आला आहे.



# नेरळ स्मशानभूमी नुतनीकरणाचे लोकार्पण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ येथील गणेश घाट परिसरात हिंदू स्मशानभूमीच्या नुतनीकरणाच्या कामाचा लोकार्पण सोहळा मंगळवारी (दि.३०)पार पडला. यानिमित्ताने नेरळमधील नागरिकांसाठी अंत्यविधीची आवश्यक व सुसज्ज सुविधा पुन्हा एकदा खुली करण्यात आली आहे.

नेरळ ग्रामपंचायतीच्या हिंदू स्मशानभूमीची अवस्था मागील काही वर्षांपासून अत्यंत दयनीय झाली होती. लाकडे ठेवण्याच्या खोल्या जिर्ण झाल्या होत्या, तसेच अंत्यविधीच्या वेळी नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. त्यासाठी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर करून स्मशानभूमीच्या नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. नुतनीकरणाच्या कालावधीत नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून बाजूच्या पर्यायी जागेवर अंत्यविधीची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, नेरळच्या वाढत्या लोकसंख्येमुळे ही व्यवस्था अपुरी ठरत होती. अखेर नुतनीकरणाचे काम पूर्ण झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. या नुतनीकरणात लाकडे साठवण्यासाठी प्रशस्त खोल्या, बसण्यासाठी तसेच अंत्यविधी व दशक्रियाविधीसाठी मोठा हॉल, तीन सरणांची व्यवस्था, प्रेत ठेवण्यासाठी दोन कठडे, अंत्यविधीनंतर राख सावडण्यासाठी ओहळात सोयीस्कर व्यवस्था, हातपाय धुण्याची व्यवस्था तसेच परिसर सुशोभीकरण व वृक्षलागवड करण्यात आली आहे.

# पत्रकार दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनीतील चांभार्ली येथील फार्महाऊसमध्ये वर्षअखेरीस महाराष्ट्र राज्य व रायगड जिल्ह्यातील पत्रकारांच्या आगामी वर्षातील उपक्रमांचे नियोजन करण्यासाठी कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्यावतीने बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महाड तालुक्यातील संतोष घरटकर यांची जिल्हा कार्याध्यक्षपदी तर राहूल जाधव यांची जिल्हा कार्यकारीणी सदस्यपदी निवड करण्यात आली. यावेळी सुरेश शिंदे, जयेश जाधव, अर्जुन कदम, विनायक पाटील, सुनिल पाटील, किरण मोरे व सुभाष म्हात्रे आदी उपस्थित होते. याखेरिज रूपाली पवार यांची पोलादपूर सरचिटणीसपदी व अन्य तालुक्यातील मान्यवर पत्रकारांची तालुका कार्यकारिणीतील विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली.

### भांनग ग्रा.पं.कडून ज्येष्ठांचा सन्मान

**तळा :** ग्रुप ग्रामपंचायत भानंग येथे सामाजिक बांधिलकी जपणारा ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. आयुष्यभर कष्ट, संस्कार आणि मूल्यांची शिदोरी पुढील पिढीला देणाऱ्या वृद्ध जोडप्यांचा तसेच ग्रामपंचायत हद्दीतील जेष्ठ नागरिकांचा सन्मान गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.

# अरुण पवार यांना पुरस्कार जाहीर



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव येथील ज्येष्ठ पत्रकार अरुण तुकाराम पवार यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल स्व. माजी आ. मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग, भाई जगताप मित्रमंडळ रायगड व ॲड. उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण शनिवारी (दि.३) सायंकाळी सायंकाळी साडेपाच वाजता अलिबाग तालुक्यातील सातिर्जे येथे करण्यात येणार आहे. त्यांना जाहीर झालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे भुते, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती त्या मिळकतीच्या विद्यमान कृष्णा गोविंद पाटील, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| भुते ता.अलिबाग | १४/१ | जिरायत ०-०६-००<br>पो.ख. ०-०२-००<br>एकुण ०-०८-०० | ०.१२ |
| भुते ता.अलिबाग | १२/२ | जिरायत ०-१०-२०<br>पो.ख. ०-०४-५०<br>एकुण ०-१४-७० | ०.२३ |

वर नमुद जमिन मिळकती या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेल्या मिळकती निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ३०/१२/२०२५
मोबा. ९८२२०१७१६१

**ॲड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे**
मु.पो.भूते,
ता. अलिबाग, जि. रायगड

## पान १ वरून

### जड-अवजड वाहनांना बंदी

करण्यात आल्या आहेत. यावेळी मुंबई-गोवा महामार्ग क्र. ६६ येथील खारपाडा ते कशेडी, राष्ट्रीय मार्ग क्र. ७५३-एफ येथील माणगांव-ताम्हणी घाट मार्गे दिघी, राष्ट्रीय मार्ग क्र. ५८४-अ येथील कर्जत-पळसदरी-खोपोली-पालीफाटा-वाकण, राष्ट्रीय मार्ग क्र. १६६ येथील वडखळ-अलिबाग, राज्य मार्ग येथील चौकफाटा-कर्जत, अलिबाग-मूरूड व अलिबाग-मांडवा या मार्गावरून बुधवारी (दि.३१) सकाळी आठ ते १ जानेवारी रोजी रात्री बारा वाजेपर्यंत जड-अवजड वाहनांना वाहतूक बंदी असणार आहे. या कालावधीत वाहन चालकांनी पर्यायी नियोजन व सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### खांदेरी दुर्गावर विजय दिनाचे आयोजन

समाजमनात पुन्हा जागवण्याचा हा प्रयत्न असून, नागरिकांनी, इतिहासप्रेमींनी व तरुण पिढीने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आपला कट्टा संस्था, आम्ही स्वच्छंदी फाऊंडेशन, शिवशंभू विचार मंच कोकणप्रांत आणि सागरी सीमा मंच कोकणप्रांत यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### तिकीट नाकारल्याने भाजपा माजी नगरसेवकांची बंडखोरी

असून, नवीन पनवेल मधील माजी नगरसेविका ॲड. वृषाली पाटील यांना देखील पक्षाकडून तिकीट नाकारण्यात आल्याने त्यांच्यात देखील नाराजीचे वातावरण असल्याने नाराजी दूर करण्यासाठी पक्षातील वरिष्ठांना प्रयत्न करावे लागणार आहेत.



# धिंगाणा घालणाऱ्यांवर कारवाई होणार

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण सह परिसरात नववर्षाच्या स्वागतासाठी ३१ डिसेंबर रोजी होणाऱ्या पार्ट्यांमध्ये मद्यप्राशन व गैरप्रकार रोखण्यासाठी उरण परिसरात पोलीस प्रशासन सज्ज झाले आहेत. अशी माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांनी दिली आहे.

तसेच, मद्यप्राशन करुन वाहन चालविणे, मारामारी अथवा अनुचित प्रकार केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देखील देण्यात आला आहे. तालुक्यातील फार्महाऊस परिसरावरही नजर ठेवली जाणार असून उरण चारफाटा, नवघर फाटा, पिरवाडी समुद्रकिनारा या ठिकाणी नाका बंदी करण्यात येणार आहे.

यादरम्यान, अनुचित प्रकार आढळून आल्यास कारवाई केली जाणार असून नियमभंग केल्यास दंड ठोठावला जाणार आहे. या बंदोबस्तात २ पीआय, १० अधिकारी, ३५ कर्मचारी यांच्यासह बीट मार्शल व पेट्रोलिंग केले जाणार आहे.

यावेळी अधिकारी देखील बंदोबस्तासाठी तैनात असणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी सुरक्षित व शिस्तबद्ध पद्धतीने नववर्ष साजरे करण्याचे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांनी केले आहे.

**पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६**
**प्रभागनिहाय सुधारित मतदान केंद्रांची यादी**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करीता मतदारांची संख्या विचारात घेऊन एकूण ६६० मतदान केंद्र निश्चित करण्यात आली होती व मा. राज्य निवडणूक आयोगाकडील दिनांक ०९/१२/२०२५ रोजीच्या सुधारित वेळापत्रकानुसार सदरची यादी दि. २०/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर प्रसिद्ध करण्यात आलेल्या मतदान केंद्रापैकी मतदारांच्या सोयीच्या दृष्टीने खालील तक्त्यात नमूद मतदान केंद्रामध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

तरी प्रभागातील सर्व मतदार व उमेदवार यांनी सदर बाबीची नोंद घ्यावी.

| अ.क्र | प्रभाग क्रमांक | मतदान केंद्र क्रमांक | पुर्वीच्या मतदान केंद्राचा तपशिल | सुधारित मतदान केंद्राचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | १८ | १८/१ | कोकण एजुकेशन सोसायटी, विठोबा खंडप्पा हायस्कुल पनवेल खोली नं. १ | शांतिनिकेतन पब्लिक स्कूल नवीन पनवेल, खोली नं ०५ |
| २. | १८ | १८/२ | कोकण एजुकेशन सोसायटी, विठोबा खंडप्पा हायस्कुल पनवेल खोली नं २ | शांतिनिकेतन पब्लिक स्कूल नवीन पनवेल, खोली नं ०६ |
| ३. | २० | २०/१ | नर्सरी स्कूल काळुंद्रे पनवेल, जी प. अंतर्गत उत्तर बाजू खोली क्र. १ | फॉरेस्ट कॉलनी गोडाऊन, तक्का |
| ४ | २० | २०/२ | नर्सरी स्कूल काळुंद्रे, पनवेल, जी. प. अंतर्गत उत्तर बाजू खोली क्र. २ | श्री. संत सावतामाळी सभागृह, प्लॉट नं. १२, फा.क्र. ४१३/०२ रेल्वे स्टेशन रोड तक्का सभागृह पार्टीशन खोली नं. ०१ |
| ५ | २० | २०/३ | नर्सरी स्कूल काळुंद्रे, पनवेल, जी प. अंतर्गत उत्तर बाजू खोली क्र. ३ | श्री. संत सावतामाळी सभागृह, प्लॉट नं. १२, फा.क्र. ४१३/०२ रेल्वे स्टेशन रोड तक्का सभागृह पार्टीशन खोली नं. ०२ |
| ६ | २० | २०/६ | राजिप शाळा भिंगारी, पनवेल खोली क्र. ३ | एम एस ई बी ऑफिस हॉल, तक्का |
| ७ | २० | २०/२३ | एम एन आर गोल्डन किड्स तक्का खोली क्र. १ | पनवेल महानगरपालिका ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पोदी शाळा नवीन पनवेल, कार्यालय शेजारी खोली क्र. ०६ |

स्थळ :- पनवेल
दिनांक :- ३०/१२/२०२५

स्वाक्षरी/-
**(मंगेश चितळे)**
निवडणूक अधिकारी तथा आयुक्त, पनवेल महानगरपालिका

# वर्षभरात ४३३ आंदोलने, मोर्चे



## काही प्रश्न सुटले, तर काही अजूनही लाल फितीत



**प्रमोद जाधव**
**। रायगड ।**

रायगड जिल्ह्यातील औद्योगिक कंपन्यांतील प्रश्नांसह पिण्याचे पाणी, नोकरीत कायम करणे, मराठा आरक्षण, धनगर आरक्षण, मिनीडोअर वयोमर्यादा वाढविणे, स्मार्ट मीटर रद्द करणे, अशा अनेक मागण्यांसाठी वर्षभरात ४३३ मोर्चे, आंदोलने व उपोषणे करण्यात आली आहेत. काही प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न होत असतानाच काही प्रश्नांची सोडवणूक करण्याचे आश्वासन दिल्याने हे प्रश्न अजूनही लाल फितीत अडकूनच आहेत.

जिल्ह्यामध्ये दोन हजारहून अधिक प्रकल्प असून काही प्रकल्प नव्याने होऊ घातले आहेत. या प्रकल्पांमध्ये नोकरी देण्यापासून शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन प्रकल्प उभारण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलने करण्यात आली आहेत. आदीवासी समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक होण्याबरोबरच ओबीसी, मराठा व धनगर समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नांबाबतही मोर्चे काढण्यात आले आहेत. जिल्ह्यामध्ये मार्च महिना उजाडल्यावर पाणी प्रश्न कायमच भेडसावतो. शासनाने जलजीवन योजना राबवून अनेक गावे पाण्यापासून वंचित राहिली आहेत. काही ठेकेदारांनी आपल्या मनमानी कारभाराने या योजेनचे काम केल्याने गावांतील ग्रामस्थांनी याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयासह जिल्हा परिषदेसमोर उपोषण केले आहेत. जूनी पेन्शन योजना लागू करण्याबरोबरच कंत्राटी परिचारिकांना कायम करण्यासाठी अनेकवेळा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलने करण्यात आली. अंगणवाडी सेविकांसह महसूल, शिक्षकांनी देखील त्यांच्या मागण्यांसाठी आंदोलन केली आहेत. तसेच, जिल्ह्यातील मिनीडोअर चालक-मालकांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी अनेकवेळा मोर्चे, आंदोलने करण्यात आली आहेत. यावेळी प्रशासनाकडून फक्त आश्वासने देण्यात आली. त्यामुळे हे प्रश्न अजूनही प्रलंबित आहेत. स्मार्ट मीटरविरोधात शेकापच्यावतीने आंदोलन करण्यात आले होते. शेकापने स्मार्ट मीटरमुळे भरमसाठ विजबील येत असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासह महावितरण कंपनीच्या कार्यालयात जाऊन लढा पुकारला होता. तसेच, महावितरण कंपनीमध्ये खासगीकरण सुरू केल्याने कर्मचारी संघटनेच्यावतीने आंदोलन करण्यात आले होते. रायगड जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसह महसूल कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालयासमोर आंदोलने करण्यात आली होती. आरोग्य विभागात काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन वेळेवर न दिल्याने आंदोलन करण्यात आले होते. अलिबाग-रोहा, अलिबाग-पेण मार्गावरील रस्त्यांचे काम प्रलंबित राहिल्याने ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांविरोधात शेकापने अलिबाग-पेण मार्गावर मोठे आंदोलन पुकारले होते. मिनीडोअर चालक मालक संघटनेचे खड्डे भरो आंदोलन केले होते. तसेच, काही संघटनांनी रस्त्यात रोपटे लावून आंदोलन केले. तसेच, काहींनी खड्ड्यातील पाण्यात पोहण्याचा आनंद घेत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे काम केले.

जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्गाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी जिल्ह्यातील पत्रकारांसह वेगवेगळ्या सामाजिक संस्था, संघटनांनी आंदोलने केली आहेत. जिल्ह्यातील रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात अनेकांनी उपोषण केले आहे. अलिबाग तालुक्यातील उसर येथे दुसऱ्या टप्प्यातील येणाऱ्या प्रकल्पात स्थानिकांना प्राधान्याने घेण्यात यावे, तसेच उसर येथे उभ्या राहणाऱ्या शासकिय मेडीकल कॉलेजमध्ये स्थानिकांना रोजगार द्या. शेतकऱ्यांना शेतीमध्ये जाण्यासाठी मार्ग द्या, अशा अनेक मागण्यांसाठी आंदोलने झाली आहेत. भरमसाठ वीज बील, रिडींग न घेणे अशा अनेक समस्यांना ग्राहकांना तोंड द्यावे लागत आहे. सर्वसामान्यांना होणाऱ्या या त्रासाबाबत शेकाप आक्रमक झाला आहे. शेकापच्यावतीने महावितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयावर मोर्चा काढण्या आला होता. भरमसाठी बील येणे थांबवा, नियमीत दर महिन्याला रिडींग घ्या, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली होती. मराठा समाजाला कुणबी दाखले देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात कुणबी समाजाच्यावतीने जिल्ह्यातील तहसील कार्यालयांवर मोर्चा काढण्यात आला होता. कुणबी आरक्षणातील मराठ्यांच्या घुसखोरीचा निषेध यावेळी व्यक्त करण्यात आला. मराठा समाजाला ओबीसी आरक्षणाचा लाभ देण्यामुळे ओबीसींच्या हक्कांवर गदा येत असून, हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांचे निवेदन कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई या संस्थेच्या माध्यमातून तहसीलदारांना देण्यात आले. महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांचे महसूल मंत्र्यांनी विना चौकशी निलंबन केल्याने त्यांच्याविरोधात महसूल विभागातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदारांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन दिले. तलाठ्यांनी ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार टाकला होता. या आंदोलनातदेखील तलाठ्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. कामगार कायद्याबरोबरच जनसुरक्षा विधेयकाविरोधातदेखील जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले. जिल्ह्यामध्ये १६ मोर्चे, १५४ आंदोलने, २६३ उपोषण झाले आहेत. त्यामध्ये सर्वाधिक आंदोलन ही जिल्ह्यातील महत्त्वाचे प्रकल्प व अंतर्गत रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांच्या दुरुस्ती संदर्भात करण्यात आली. स्वतःच्या न्याय व हक्कांसाठी लढणाऱ्या उपोषण व आंदोलनकर्त्यांपैकी २५ टक्केहून अधिक नागरिकांना पोलिसांच्या कारवाईला सामोरे गेले आहेत. यातील काहींचे प्रश्न सुटले. परंतु काहींचे प्रश्न अजूनही शासनाच्या लाल फितीत अडकून असल्याचे चित्र आहे. या नव्या वर्षात या प्रश्नांची सोडवणूक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अठरा लाचखोरांना एसीबीचा दणका

## बारा लाख ६६ हजार ५०० रुपयांची लाच घेताना केली कारवाई

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने जानेवारी ते आतापर्यंत १८ लाचखोरांना दणका दिला आहे. बारा लाख ६६ हजार ५०० रुपयांची लाच घेतांना त्यांना रंगेहाथ पकडले आहे. त्यात एका महसूल कर्मचाऱ्याला १५ हजार रुपयांची लाचेची मागणी करताना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत महसूल आणि सिडको अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश अधिक आहे. लाच घेणे कायद्याने गुन्हा असतानादेखील अनेक शासकीय कार्यालयात काही लाचखोर अधिकारी व कर्मचारी लाच घेऊन काम करतात. लाच न दिल्यास ते काम करीत नाहीत, अशा तक्रारी वारंवार येत असतात. लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यरत आहेत. लाच घेऊ नये, म्हणून वारंवार या विभागामार्फत जनजागृती केली जाते. वेगवेगळ्या विभागात शिबीर घेतले जातात. तरीदेखील काही अधिकारी व कर्मचारी लाच घेतात. या लाचखोरांना दणका देण्याचे काम नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केले आहे. या विभागाने अकरा ठिकाणी कारवाई केली आहे. त्यात १८ जणांना लाच घेताना रंगेहाथ पकडल्याची माहिती या विभागाकडून प्राप्त झाली आहे.

पेण येथील पंचायत समितीमध्ये ११ एप्रिल रोजी छापा टाकण्यात आला. या छाप्यात एका आरोपीला पाच हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले आहे.




पेण व पनवेल महावितरण कंपनीच्या एका कार्यालयात नऊ जूलै व २४ एप्रिलमध्ये छापा टाकला. त्यामध्ये पाच हजार रुपये व एक लाख ८४ हजार रुपयांची लाच घेताना एकूण तिघांना पकडण्यात आले. महसूल विभागात तीन ठिकाणी वेगवेगळे छापे टाकले. या छाप्यात १५ हजार रुपये, दहा हजार रुपये, व पंधरा हजार रुपये असे एकूण ४० हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी कारवाई झाली.

सिडको विभागात चार ठिकाणी छापे टाकले. नऊ जणांविरोधात कारवाई करीत त्यांना एकूण दहा लाख तीस हजार रुपयांची लाच घेताना पकडले आहे. बेलापूर येथील न्याय विभागातील एका व्यक्तीला अडीच हजार रुपयांची लाच घेताना पकडले आहे. एकूण ११ ठिकाणी छापे टाकून १८ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांना १२ लाख ६६ हजार ५०० रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडल्याची माहिती नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून देण्यात आली. नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे, की, कोणीही लाच मागत असेल, तर तात्काळ नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ९९२०३५१०६४ येथे संपर्क साधावा असे आवाहन पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील प्रकल्प अपुर्णच

## रायगडकरांची घोर निराशा, कुर्म गतीच्या कामाचा फटका

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग - रोहा मार्गावरील रस्त्याच्या कामांचे अनेक वेळा भूमीपूजन झाले. प्रत्यक्षात मात्र हे काम अजूनपर्यंत पुर्ण झाले नाही. साळाव-तळेखार रस्तादेखी अपूर्ण स्थितीत आहे. मुंबई गोवा महामार्गाचे काम सुरु होऊन १५ वर्षाहून अधिक पूर्ण झाले आहे. या रखडलेल्या महामार्गाच्या कामासाठी वेगवेगळ्या संस्था, संघटनांबरोबरच पत्रकारांनीदेखील आवाज उठविला. अनेक वेळा आंदोलने, मोर्चे काढले, निवेदन देऊन महामार्गाचे काम पूर्ण करण्याची मागणी केली. मात्र आजही चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्यास संबंधित विभाग उदासीन ठरत आहेत. या संथगतीने सुरु असलेल्या कामांमुळे पर्यटकांसह नागरिक व जिल्ह्यातील स्थानिक त्रस्त झाले आहेत. यावर्षात जिल्ह्यातील या रस्त्याचे काम पुर्ण होण्याची अपेक्षा होती. परंतु या वर्षात काम पुर्ण करण्यास ही यंत्रणा कमी पडली आहे. त्यामुळे नव्या वर्षातदेखील मुंबई-गोवा महामार्गासह अलिबाग रोहा मार्गावरील प्रवास खडतर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

अलिबाग तालुक्यातील उसर येथील गुरचरण जागेमध्ये शासकिय वैद्यकिय महाविद्यालय उभारण्यासाठी मागील चार वर्षापूर्वी भूमीपूजन करण्यात आले होते. मात्र या प्रकल्पाचे काम संथगतीने सुरु आहे. त्यामुळे हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आणखी किती वर्षे वाट पहावी लागणारअसा प्रश्न उपस्थित होत आहे. कोट्यावधी रुपयांचे असणारे प्रकल्प कधी होणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

अलिबाग तालुक्यातील विद्यानगर येथील मुकबधीर विद्यालयाच्या जून्या इमारतीच्या जागी नवीन इमारत बांधण्यासाठी १५ ऑगस्ट २०२१ मध्ये भूमीपूजन सोहळा पार पडला होता. एक वर्षात हे काम पुर्ण होण्याची अपेक्षा होती. परंतु मुकबधीर विद्यालयाचे काम कुर्म गतीने सुरु आहे. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे. भाडे तत्वावर घेतलेल्या जागेत मुलांना शिकविण्याची वेळ प्रशासनावर येत आहे. ३१ गुंठे क्षेत्रात असलेल्या या जागेत एक मजली इमारत बांधली जाणार आहे. आठ वर्ग खोल्या, मुले व मुलींसाठी स्वतंत्र निवासस्थाने, अधीक्षकांसाठी कार्यालय व निवासस्थान, वैद्यकीय कक्ष, श्रवण चाचणी खोली, अंतर्गत खेळाची खोली, सुस्सज असे सभागृह, गार्डन, क्रिडांगण, व्यवसायिक प्रशिक्षण हॉल आदी सुविधा असणार आहेत.तीन वर्षे होऊनही हे काम अद्याप पुर्ण झाले नाही. अलिबाग तालुक्यातील किहीम या ठिकाणी पक्षी अभ्यासक डॉ. सलीम अली यांच्या नावाचे अभ्यास केंद्र व संशोधन केंद्र उभारण्यासाठी करोडो रुपये खर्च करण्यात आले. मात्र गेल्या चार वर्षापासून हे प्रकल्प अपूर्ण स्थितीत आहे. जिल्ह्यातील तालुक्यामधील क्रिडा संकुलच्या कामांना निधी अभावी ब्रेक लागला आहे. सुसज्ज असे मैदान, दोनशे मीटर धावण्याचे ट्रॅक, संरक्षीत भिंत, कबड्डी, खो-खोखो, कुस्तीसाठी इनडोअर मल्टीपर्पज हॉल,अद्ययावत अशी व्यायामशाळांची कामे रखडली आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारित ग्रामीण भागातील रस्त्यांची लांबी पाच हजार ५०० किलो मीटर असून जिल्ह्यातील दोन हजारहून अधिक किलो मीटरचे रस्ते खराब झाले आहेत. अतिवृष्टीमुळे हे रस्ते खराब झाल्याची माहीती समोर येत आहे. गावांपर्यंत जाण्यासाठी खड्डेमय रस्ते असल्याने प्रवास करताना भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खड्डेमय रस्त्यामुळे अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परंतु निधी अभावी ही कामे रखडली आहेत. रायगड जिल्हा परिषदेची जूनी इमारत जीर्ण झाल्याने कुंटेबाग येथे कार्यालय स्थलांतरीत करण्यात आले.




# कुरुळ ग्रामपंचायतीने दंड थोपटले

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग-कुरूळ रस्ता नादूरुस्त आहे. या रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत प्रशासनाकडून कानाडोळा केला जात आहे. त्यामुळे कुरूळ ग्रामपंचायतीने प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात दंड थोपटले आहे. अलिबाग बायपास कॉर्नर ते कुरुळ या महत्त्वाच्या मार्गाच्या प्रश्नावर, प्रशासनाच्या अपयशावर नाराजी व्यक्त करत मंगळवारी (दि. २३) ग्रामसभेत ठराव मंजूर करण्यात आला. रस्ते दुरुस्त करा, अन्यथा जनआंदोलन अटळ असा इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे.

अलिबाग बायपास कॉर्नर ते कुरुळ या दरम्यानच्या रस्त्याची गेल्या सहा महिन्यांपासून अवस्था बिकट झाली आहे. या मार्गावर खोल खड्डे, उखडलेले डांबर, पावसात साचणारे पाणी यामुळे वाहनचालक, विद्यार्थी, रुग्ण, महिला व ज्येष्ठ नागरिक अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत. अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. तरीदेखील सार्वजनिक बांधकाम विभाग गाढ झोपेत असल्याचा थेट आरोप ग्रामस्थांनी केला.

दैनंदिन प्रवास करणाऱ्या कुरुळमधील व आसपासच्या गावांतील ग्रामस्थांना भयंकर त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे.स्त्यांची तातडीने दुरुस्ती न झाल्यास,ग्रामस्थ उपोषण आणि रास्ता रोको आंदोलनाच्या भुमिकेत आहेत. पुढील आठवड्यात आंदोलन केला जाईल असा ठराव घेण्यात आला. आता शांत बसणार नाही! रस्ते दुरुस्त करा, अन्यथा जनआंदोलन अटळ आहे, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते तथा ग्रामपंचायतीचे माजी सदस्य ॲड. प्रसाद पाटील यांनी दिला आहे.

# दारु बंदीचा ठराव मंजूर

- **चिरनेरमध्ये गैर प्रकाराविरोधात महिला आक्रमक**
- **व्यसनाधीनतेमुळे तरुण पिढी मृत्यूच्या दारात**




**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर गावात महिलांच्या पुढाकारातून दारूची बाटली आडवी करण्यात आली आहे. अर्थातच दारू बंदीचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. गावात गेल्या अनेक दिवसांपासून अवैधरित्या दारूची सर्रास विक्री होत होती. या गैरप्रकाराविरोधात येथील महिला आक्रमक झाल्या. गावात गेल्या अनेक दिवसांपासून अवैधरित्या दारूची सर्रास विक्री होत होती. या गैर प्रकाराविरोधात येथील महिला आक्रमक झाल्या. त्यांनी दारू बंद करण्याची मागणी करीत, शुक्रवारी तत्काळ ग्रामसभा बोलावली. या ग्रामसभेमध्ये महिलासह ग्रामस्थांनी दारूबंदीचा ठराव एकमताने मंजूर केला. दरम्यान, या निर्णयाचे महिलांनी मोठ्या जल्लोषात स्वागत केले.



चिरनेर ऐतिहासिक व धार्मिक परंपरेचे गाव असून सुसंस्कृत म्हणून या गावाकडे पाहिले जाते; मात्र काही वर्षांपासून गावात लपूनछपून अवैध दारू विक्री सुरू होती. दारूमुळे घरगुती हिंसाचारांच्या घटना वाढल्या, कौटुंबिक कलह निर्माण झाले होते. मध्यतरी काही तरुणांनी कौटुंबिक कलहातून एका कुटुंबाला मारहाण केल्यामुळे गावात अशांतता निर्माण झाली होती. त्यात अशा दारुच्या व्यसनाधीन मुळे गावातील तरुण पिढी मृत्यूच्या दारात उभी ठाकली आहे. त्यामुळे अनेक महिलांचे कुंकू पुसले आहे. असे मृत्यूचे प्रकार, कुटुंब कलह पुन्हा निर्माण होऊ नयेत, या उद्देशातून अखेर चिरनेर गावातील महिलांनीच पुढाकार घेऊन, दारूबंदीकरिता एक पाऊल पुढे टाकले, हे विशेष!

यावेळी सरपंच भास्कर मोकल, अरुण पाटील, पद्माकर फोफेरकर, प्रफुल्ल खारपाटील, सचिन घबाडी, समाधान ठाकूर, दिपक कातकरी, समिर डुंगीकर, भारती ठाकूर, निकिता नारंगीकर, मृणाली ठाकूर, वनिता गोंधळी, जयश्री चिर्लेकर, समुद्रा म्हात्रे, यशोदा कातकरी, जयंवती गोंधळी, ग्रामसेवक रविंद्र गावंड सह गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. गावातील ग्रामसभेत घेण्यात आलेल्या ठरावा संदर्भात योग्य ती कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड, उरण तहसील, उरण पोलीस ठाणे, पंचायत समिती उरण, उत्पादन शुल्क विभाग उरण या ठिकाणी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मात्र चिरनेर गावातील बाटली आडवी होते की पुन्हा गावात दारुचा महापुर येते याकडे तालुक्यातील तळीराम बरोबर जनतेच्या नजरा भिडल्या आहेत.

### महिलांच्या एल्गाराला यश

दारूमुळे अनेक कुटुंब उद्धवस्त झाली आहे. यामुळे अनेक ठिकाणी दारूबंदी केली आहे. दरम्यान आता गावात एकमताने दारूबंदीचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. याबाबतचा लढा तेथील महिला अनेक काळापासून देत होत्या. आता त्यांच्या लढ्याला यश आले आहे.

### दारू तस्करी रोखण्यासाठी

# राज्य उत्पादन शुल्क विभाग सज्ज

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

निवडणुक तसेच नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर अवैध दारू विक्री आणि वाहतूक रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने कंबर कसली आहे. त्यासाठी विशेष भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. विनापरवाना पार्ट्यांचे आयोजन केल्यास कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे तसेच वाहनांची तपासणी करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

पनवेल महारनगरपालिका निवडणूकच्या पार्श्वभूमीवर आणि नववर्ष स्वागतासाठी अनेकदा बेकायदा, छुप्या पद्धतीने पार्ट्या आयोजित केल्या जातात. राज्य उत्पादन शुल्क विभागाची नजर राहणार आहे. त्याचप्रमाणे हातभट्टीच्या दारूची विक्री रोखण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उत्पादन शुल्क विभागामार्फत जिल्ह्यात पाच कार्यकारी निरीक्षक आणि दोन भरारी निरीक्षक पथके कार्यरत करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात मद्यविक्रीमध्ये परराज्यातील मद्य विक्री होणार नाही याबाबत खबरदारी घेण्यात येणार आहे. नववर्ष स्वागतासाठी विनापरवाना पाट्यांचे आयोजन करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल.



दारू पार्टीसाठी परवानगी असणे आवश्यक आहे. एकदिवसीय परवाना न घेता विनापरवाना मद्यविक्री होत असल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करणार असल्याचे संकेत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक रविकिरण कोले यांनी दिले आहेत. तसेच कारवाई टाळण्यासाठी एकदिवसीय परवाना घेऊनच आयोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. पनवेल तालुका पोलिसांद्वारे खारपाडा, कोन, नेरे येथे नाकाबंदी असणार आहे. तर पनवेल वाहतूक शाखेतर्फे आदई सर्कल, ठाणा नाका गार्डन हॉटेल सिग्रल, शिवशंभो नाका पनवेल, बडघर नाका, उरण नाका ब्रिज या ठिकाणी नाकाबंदी करण्यात येणार आहे. पनवेल तालुका पोलिसांतर्फे २ पीआय, ८ पीएसआय/एपीआय, ४८ पोलीस स्टाफ असे एकूण ५८ पोलीसांचा वॉच राहणार आहे तर पनवेल वाहतूक शाखेचे तीन ऑफिसर आणि २० स्टाफ यावेळी विविध ठिकाणी हजर राहणार आहेत.

# महायुतीचे तीन तेरा

महाविकास आघाडीत मतभेद आहेत हे कधीच लपून राहिलेले नव्हते. मुळात काँग्रेस आणि शिवसेना हे दोन भिन्न टोकांचे पक्ष एकत्र आलेले असल्याने तसे होणे अपरिहार्य होते. शिवाय, वर्षानुवर्षे एकमेकांच्या विरोधात लढलेले असल्याने वॉर्ड ते विधानसभाच नव्हे तर लोकसभेपर्यंतदेखील सर्व मतदारसंघात यांची आपापली ताकद व तितकेच भरघोस उमेदवार असणार हे उघड होते. त्यातूनच अनेक ठिकाणी स्वतंत्र लढणे त्यांना भाग पडते आहे. पण महायुतीचे तसे नव्हते. आम्ही नैसर्गिक मित्र आहोत अशी यांची बतावणी होती. हिंदुत्व हा आम्हाला बांधणारा धागा आहे असे ते म्हणत होते. अजितदादा हे या दोघातले तिसरे. त्यामुळे त्यांना कायम वेगळेपणाची वागणूक असते. महापालिका निवडणुका जाहीर झाल्या त्या दिवशी खुद्द देवेंद्र फडणवीसांनी जाहीर केले की भाजप व शिंदे सेना हे सर्व महापालिका एकत्र लढतील असा निर्णय झाला आहे. पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये अजितदादांची राष्ट्रवादी व भाजप समोरासमोर लढतील असेही त्यांनी मुद्दाम नाव घेऊन सांगितले. त्यानंतर दहा दिवस तथाकथित नैसर्गिक मित्रांचे गोत्र, प्रवर, नक्षत्र इत्यादी बघून कुंडल्या जुळवण्याचे उद्योग चालू आहेत त्याने सामान्य माणसांची चांगलीच करमणूक केली आहे. जागावाटपावरून शेवटच्या क्षणापर्यंत जी झटापट झाली तिच्यामुळे या तथाकथित फेविकॉल महायुतीचे कसे तीन तेरा वाजले आहेत हे उघड झाले. मंगळवारी दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. त्या दिवशी सकाळपर्यंत २९ पैकी किती शहरांमध्ये महायुती एकत्र लढणार आहे याबाबत काहीही स्पष्टता आलेली नव्हती. मुंबईमध्ये भाजपला १३७ व सेनेला ९० जागा देऊन अंतिम मांडवली झाली अशा बातम्या होत्या. पण दोन्ही बाजूंना प्रचंड नाराजी कायम आहे. त्यामुळे अर्ज मागे घेण्याच्या दिवसापर्यंत हे सर्व नाटक चालू राहील असे दिसते. दुसरीकडे नाशिक, सोलापूर, नवी मुंबई, मीरा भाईंदर, उल्हासनगर अशा अनेक ठिकाणी भाजपच्या अडेलतट्टूपणामुळे युती तुटल्यात जमा आहे. इतर ठिकाणी तर आपण युतीत आहोत की नाही हे अगदी नेत्यांनाही सांगता येणार नाही अशी परिस्थिती आहे.

## शिंदे सेना दरवाज्याबाहेर

हे घडले कारण, ही निव्वळ सत्तेच्या स्वार्थाने एकत्र आलेल्यांची युती आहे. यांना कोणतेही तत्व, लोकांचे कल्याण यांचे काहीही पडलेले नाही. महापालिका निवडणूक ही कार्यकर्त्यांची आहे व आम्ही त्यांना ताकद देतो असे फडणवीस मोठ्या गर्वाने सांगत होते. तसे होते तर यांनी सर्व काही त्या त्या शहरांमधल्या लोकांवर सोडून द्यायला हवे होते. प्रत्यक्षात यांचे सर्व निर्णय मुंबईतून आणि तेही फडणवीस, रवींद्र चव्हाण असे मोजकेच लोक घेत होते. म्हणूनच पुण्यात शिंदे सेनेला जेमतेम २५ जागा देऊ केल्या गेल्या. त्यावरून चिडलेल्या शिंदे सेनेच्या नेत्यांनी सोमवारी मध्यरात्री युती तुटल्याची घोषणा केली. पण मग मंगळवारी सकाळी याबाबत मुंबईतून दट्ट्या आल्यावर सारवासारव करण्यात आली. आता समजा तेथे युती झाली तरीही मनोमीलन झालेले नाही हे अगदी नक्की आहे. कल्याण डोंबिवलीमध्ये युतीच्या जागावाटपाची लोक वाटच पाहत होते. ती झाली की तात्काळ बंडखोर म्हणून अर्ज दाखल करण्यासाठी दोन्ही बाजूंचे लोक सज्ज होते. शिंदे सेना हा खरे तर भाजपचा आश्रित पक्ष आहे. एकनाथ शिंदे हे बाळासाहेबांपेक्षा नरेंद्र मोदी व अमित शाह यांचे नाव घेत असतात. या पक्षाला स्वतःचा असा वेगळा काहीही कार्यक्रम वा विचारसरणी नाही. या स्थितीत भाजप फेकेल त्या तुकड्यांवर समाधान मानणे त्या पक्षाला भागच आहे. पण यांना स्वतःच्या ताकदीविषयी प्रचंड गैरसमज आहेत. दुसरीकडे प्रादेशिक पक्षाला कस्पटासमान लेखून त्यांना चिरडून टाकणे ही भाजपची राष्ट्रीय स्तरावरची नीती आहे. तिला शह देणारे चंद्राबाबू नायडू किंवा नीतीशकुमार अशांसारखे नेते भेटले तर भाजपवाले तात्पुरती माघार घेतात. पण त्यांचा कुटील हेतू सोडत नाहीत. शिंदे सेनेची काहीही हैसियत नसताना आधी त्यांना मुख्यमंत्रिपद देऊन खेळवण्यात आले आणि आता मुंबईत ठाकरे सेनेला संपवण्यापुरते जवळ करण्यात आले आहे. पण म्हणून या सेनेला जमेल तिथे तिची जागा दाखवून देण्यात भाजपचे नेते चुकत नाहीत. नगरपालिकेत थोड्या प्रमाणात ते झाले. आता महापालिकेत त्याचाच स्फोट झाला.

## दादांचा दणका

मुंबईतही स्वबळावरच लढण्याची फडणवीसांची इच्छा होती. पण दिल्लीवाल्यांना फडणवीसांना इतके मोठे होऊ द्यायचे नसावे. शिवाय, ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर त्याचा किती असर होईल याबाबत त्यांना नेमके ठरवता येत नसावे. त्यामुळे अमित शाह यांनी दबाव टाकून फडणवीसांना शिंदे सेनेसोबत युती करण्याची घोषणा करायला लावली. पण फडणवीस हे नागपुरचे संघवाले आहेत. वरवर हो म्हणून आतून कसा सुरुंग लावायचा हे त्यांना चांगले ठाऊक आहे. त्यांनी शिंदे सेनेला चांगले तंगवत ठेवले. शिंद्यांना मुंबईत शंभर जागा लढवायच्या होत्या. पण त्यांना जेमतेम ९० मिळाल्या आहेत. याऊलट भाजपने १३७ जागा घेऊन, उद्या निवडून आल्यास महापौर आपलाच असेल हे निश्चित केले आहे. इतर पालिकांमध्ये भाजपने शिंदे सेनेला निव्वळ दरवाज्यात उभे केले आहे. गावोगावचे शिंदे सेनेचे सरदार भाजपचे इतके ओशाळे आहेत की ते जागावाटपात अजिबात तोंड वर करून बोलू शकलेले नाहीत. पुण्यात नीलम गोऱ्हे, नाशिकमध्ये दादा भुसे, संभाजीनगरात संजय शिरसाट हे किती लाचार आहेत याचेच दर्शन झाले. त्यातून स्थानिक कार्यकर्ते या नेत्यांवर भडकले. पुण्यात नाना भानगिरे हे शहरप्रमुख तर संभाजीनगरमध्ये राजेंद्र जंजाळ हे जिल्हाप्रमुख नेत्यांवर भडकले व चर्चेतून बाहेर पडले. मुंबईत आणि ठाण्यात ही नाराजी दाबण्यात आली असली तरी मतदानात ती उफाळून येणार आहे. दुसरीकडे ज्या अजितदादांबद्दल शिंदे सेनेला महाविकास आघाडीत तक्रारी होत्या, ज्या दादांनी नंतर महायुतीत येऊन त्यांचे शिंद्यांचे मुख्यमंत्रिपद घालवले आणि जे दादा म्हणजे युतीत तडजोड म्हणून आलेले तिसरे गडी आहेत हे सांगायला शिंदे विसरत नाहीत त्याच दादांशी नाशिक, सोलापूर इत्यादी ठिकाणी भाजपच्या विरोधात युती करण्याची पाळी शिंदे गटावर आली आहे. शाह यांच्या दबावामुळे शिंदे यांच्या गटातून उघडपणे मोठे नेते फोडणे भाजपवाल्यांनी बंद केले. पण अजितदादांचे पुण्यातील अनेक माजी नगरसेवक भाजपने गेल्या काही दिवसात आपल्याकडे आणले. त्याला अजितदादांनी सोमवारच्या एका दिवसात जोरदार प्रत्युत्तर दिले व भाजपच्या असंख्य बंडखोरांना खुला प्रवेश दिला. एकूण नाव युतीचे, पण कर्म मात्र फुटीचे किंवा खरे तर फोडाफोडीचे असा यांचा कारभार आहे. पुढले १५ दिवस आता वेगवेगळ्या शहरांमध्ये युतीवाले एकमेकांना शिव्या घालणार आहेत आणि १६ जानेवारीला पुन्हा महायुतीचाच विजय झाला म्हणून निर्लज्जपणे दावाही करणार आहेत. १५ जानेवारीला मतदान करताना शहरी मतदारांनी याचा विचार करायला हवा.

विचार

# जग अस्थिरतेच्या मार्गावर

**जागतिक अशांतता आणि वारंवार उफाळून येणाऱ्या दहशतवादी प्रवृत्तींच्या शृंखला सरत्या वर्षाला कवेत घेऊन राहिलेल्या दिसल्या. युद्ध तसेच युद्धजन्य परिस्थितीचे चटके अनेक निरपराध्यांनी सोसले. कित्येक निरपराध जीव होरपळले. या सगळ्यामागे घड्याळ्याचे काटे उलटे फिरवू इच्छिणाऱ्या राष्ट्रनेत्यांच्या सदोष ध्येयधोरणांचा आणि कल्पनांचा जसा वाटा आहे; त्याचप्रमाणे सूडाने पेटलेल्या वा पेटवलेल्या जनभावनेचाही आहे.**

अनिल आठल्ये

दोन वर्षांपूर्वी रशियाच्या दौऱ्यावर असताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतिन यांना सध्याचे युग युद्धाचे नसल्याचा सल्ला दिला होता. तेव्हा त्यांचा रोख रशियाने काही महिन्यांपूर्वीच युक्रेनवर केलेल्या हल्ल्याच्या दिशेने होता. आता एका दृष्टीकोनातून पाहिले तर पंतप्रधानांचे हे भाकीत चुकीचे म्हणता येईल, कारण गेल्या दोन-चार वर्षांपासून अनेक देशांमध्ये सशस्त्र हल्ले आणि चकमकी सुरू आहेत. म्हणजेच सद्यस्थितीत पंतप्रधानांना अभिप्रेत असणारी शांतता कोठेही दिसत नाही. अर्थात असे असले तरी दुसऱ्या दृष्टीकोनातून पाहता हे सत्यही समोर येते की, या युगात लष्करी सामर्थ्याद्वारे कोणतेही प्रश्न सुटणारही नाहीत. त्यामुळेच लष्करी बळाचा वापर करण्याचा पर्याय कोणत्याही देशाने अवलंबू नये. वर्षाच्या अखेरीस दिसणारी जागतिक परिस्थिती पाहिली तर हेच चित्र स्पष्ट दिसते.

गेल्या तीन वर्षांपासून रशिया-युक्रेन युद्ध सुरू आहे. परंतु, त्यात कोणत्याही एका बाजूला निर्भेळ यश प्राप्त झालेले नाही. मध्यपूर्वेवर नजर टाकली तर दोन वर्षांपूर्वी 'हमास' या संघटनेने इस्त्रायलवर अचानक हल्ला केला होता. या अचानक झालेल्या हल्ल्यात सुरूवातीच्या एक-दोन दिवसांमध्ये इस्त्रायलचे हजारो नागरिक मारले गेले. नागरिकांना शेकडोंच्या संख्येने बंधक बनवून हमासने गाझामध्ये डांबून ठेवले. परंतु, सुरूवातीच्या या हल्ल्यातून सावरल्यानंतर इस्त्रायलने प्रत्युत्तरादाखल संपूर्ण गाझावर भयंकर हवाई हल्ले करुन तेथील अनेक इमारती, आरोग्य केंद्रे, यंत्रणा जवळपास भुईसपाट केल्या. परिणामस्वरुप, लाखो पॅलेस्टिनी लोकांना घरदार सोडून उघड्यावर रहावे लागले. या हल्ल्यात तीस-चाळीस हजार नागरिकांना प्राण गमवावे लागले. परंतु, युक्रेन-रशिया युद्धाप्रमाणेच या संघर्षातदेखील कोणत्याही एका बाजूला निर्णायक विजय मिळालेला नाही. मनुष्यबळाची एवढी हानी होऊनदेखील हमास ही संघटना आधी होती तेवढीच मजबूत आहे. पॅलेस्टिनी नागरिकांच्या नरसंहारामुळे जगभर जनमत इस्त्रायलच्या विरोधात झाले. वर्षअखेरीस या घटनेकडे तटस्थपणे पाहिले असता स्पष्ट दिसते की, हमास आणि इस्त्रायल दोघांचेही युद्धाबद्दलचे आडाखे चुकले आहेत.

इस्त्रायल आणि हमासमधील संघर्ष त्या दोन देशांपुरता मर्यादित न राहता लेबनॉन आणि नंतर इराणपर्यंतही पोहोचला. काही महिन्यांपूर्वी मध्यपूर्वेतील अशांततेचा फायदा घेत अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवरदेखील हवाई हल्ले केले. त्यांचा या हल्ल्यामागील उद्देश इराणची अण्वस्त्रे बनवण्याची क्षमता नष्ट करणे हा होता. मात्र आज सहा महिन्यांनंतरदेखील अमेरिका या उद्दिष्टात यशस्वी झाल्याचे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. इराणच्या अण्वस्त्र बनवण्याच्या क्षमतेला धक्का अवश्य बसला. परंतु, ती पूर्णपणे नष्ट झाली, असे आज तरी वाटत नाही. या जागतिक पार्श्वभूमीवर मे महिन्यामध्ये भारतात काश्मीरमध्ये पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद्यांनी एक भ्याड हल्ला करुन पंचवीस हिंदू पर्यटकांची हत्या केली. या आधीदेखील काही वर्षांपूर्वी काश्मीरमध्ये उरी आणि पुलवामामध्ये दहशतवादी हल्ले झाले असता भारताने उत्तरादाखल पाकिस्तानवर सर्जिकल स्टाईक आणि हवाई हल्ले केले होते. म्हणजेच पहलगामच्या घटनेनंतर भारत स्वस्थ बसणार नाही, याची पाकिस्तानला जाणीव असायला हवी होती. त्यानुसार पहलगामच्या घटनेनंतर पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारताने सात मे रोजी लाहोर आणि बहावलपूर येथील दहशतवादी मुख्यालयांवर दहशतवादी हल्ले केले.

१९७१ च्या युद्धानंतर पाकिस्तानचे मर्मस्थान असणाऱ्या पंजाब प्रांतात प्रथमच अशा प्रकारचे हल्ले झाले. त्यानंतर नऊ आणि दहा मे रोजी भारताने आपली ब्रम्होस क्षेपणास्त्रे वापरुन पाकिस्तानची एक तृतियांश हवाई क्षमता नष्ट केली. हे युद्ध आणखी काही काळ सुरू राहिले असते तर पाकिस्तानकडून अण्वस्त्रांचा वापर केला जाण्याची दाट शक्यता होती. त्यामुळे भारताने हात आखडता घेऊन पाकिस्तानची शस्त्रसंधीची विनंती मान्य केली. या संदर्भात एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पाकिस्तान आणि भारत या दोन्ही देशांना अणुयुद्ध होऊ नये असे वाटत असल्याचे दिसते. त्यामुळेच ही शस्त्रसंधी झाली असे म्हणता येईल. वर्षअखेरीस या घटनेचे स्मरण होणे अनिवार्य आहे. दुसरीकडे, मध्यपूर्वेतील इस्त्रायलच्या बॉंबहल्ल्यांमुळे पाश्चिमात्य देशात त्या देशाविरुद्ध जनमत तयार झाले. त्याचा फायदा घेऊन पश्चिमेच्या देशांमध्ये स्थायिक झालेल्या मुसलमानांनी अनेकदा इस्त्रायलच्या विरोधात निदर्शने केली. मग अशा प्रकारच्या तणावाच्या परिस्थितीतच काही माथेफिरु अतिरेक्यांनी ऑस्ट्रेलियामध्ये आपला सण साजरा करणाऱ्या ज्यू धर्मियांवर दहशतवादी हल्ला केला. त्यात १५-१६ नागरिक मारले गेले. वर्षाची अखेर होत असताना या घटनेने दहशतवादाचा क्रूर चेहरा नव्याने जगासमोर आणला.

थोडक्यात बघायचे, तर सध्या जगभर एक प्रकारे अराजकाची स्थिती निर्माण झाली आहे. अर्थातच याला काही मूलभूत कारणे आहेत. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोव्हिएत संघ या दोन लष्करीदृष्ट्या तुल्यबळ शक्ती होत्या. त्यामुळे कोणतेही स्थानिक युद्ध हाताबाहेर जात असल्याचे दिसले तर त्यातून जागतिक अणुयुद्धाची भीती निर्माण होत असे. या दोन शक्तींमध्ये अणुयुद्ध झाल्यास संपूर्ण पृथ्वीवरील जीवन नष्ट होण्याची भीती असे. या जागतिक अणुयुद्धाच्या भीतीमुळेच स्थानिक युद्धांवरही एक प्रकारचा वचक होता आणि दोन्ही महाशक्ती एकत्र येऊन युद्ध करणाऱ्या छोट्या देशांना शस्त्रसंधी करण्यास भाग पाडत असत. परंतु, १९८२ मध्ये सोव्हिएत संघाचे विघटन झाले. त्यातून निर्माण झालेला रशिया अमेरिकेला कधीच तुल्यबळ नव्हता. या दरम्यान तिसरी महाशक्ती म्हणून चीनचा उदय झाला असला तरी हा देश आर्थिक महासत्ता आहे. लष्करी क्षेत्रात मात्र चीन अमेरिकेच्या बराच मागे आहे. नव्वदच्या दशकात काही काळापुरती अमेरिका ही एकच महाशक्ती जगात होती. परंतु, कालांतराने म्हणजेच एकविसावे शतक उजाडता अमेरिकेचा लष्करी आणि आर्थिक प्रभाव कमी होऊ लागला. अफगाणिस्तानसारख्या छोट्या देशामध्ये वीस वर्षे लढून तसेच हजारो सैनिक गमावूनही अमेरिकेला तालिबानवर विजय मिळवता आला नाही. अखेरीस दोन वर्षांपूर्वी अमेरिकेला अफगाणिस्तानमधून लाजिरवाण्या प्रकारे माघार घ्यावी लागली होती. बदलत्या काळातले हे वास्तवही लक्षात घेण्याजोगे आहे. संरक्षणदृष्ट्या बघता गेल्या काही वर्षांमध्ये मानवरहित विमानांचे (ड्रोन) तंत्रज्ञान वेगाने विकसित झाले आहे. त्यामुळे आता आधुनिक युद्धाचा चेहरामोहरा बदलला आहे. मध्य आशियातील येमेनसारखा मागासलेला देशही ड्रोन्सचा वापर करुन मध्यपूर्वेतील समुद्रात व्यापारी जहाजांवर राजरोस हल्ले करत आहे. अशा प्रकारे आता जागतिक व्यापारालाही स्थानिक युद्धांची झळ बसू लागली आहे. हा संदर्भही दखलपात्र म्हणावा लागेल. या परिस्थितीत 'दुष्काळात तेरावा महिना' असावा, तसे डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष झाले आणि मावळत्या वर्षाच्या सुरूवातीलाच सर्व जागतिक करार धुडकावून लावत जगातील सर्व देशांशी एक प्रकारे आर्थिक युद्ध सुरू केले. स्वाभाविकच भारतालाही त्याची झळ बसली. परंतु, अमेरिकेच्या या धोरणांचा फटका सहन करणारा भारत हा एकमेव देश नाही. त्याच्याबरोबर सर्व युरोपीय देश आणि दक्षिण अमेरिकेतील ब्राझील, आफ्रिकेतील दक्षिण आफ्रिका इत्यादी देशांनाही याची झळ पोहोचली आहे. थोडक्यात, आज आर्थिक आघाडीवर अमेरिका विरुद्ध बाकीचे जग असे चित्र निर्माण झाले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर एक काळ अमेरिका आर्थिकदृष्ट्या संपूर्ण जगाला पुरुन उरणारा देश होता. परंतु, आजची स्थिती वेगळी आहे. आज अर्थव्यवस्थेबाबत चीन अमेरिकेचा तुल्यबळ आहे. लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनेही अमेरिकेला शह देऊ शकणाऱ्या राष्ट्रांचा गट 'ब्रिक्स'च्या नावाने पुढे येत आहे. यात भारत, रशिया, चीन, ब्राझील इत्यादी देशांचा समावेश आहे. थोडक्यात सांगायचे तर, गेल्या शतकात करु शकत होता तशी धोरणे आणि दंडेली अमेरिका करु शकेल अशी आजची स्थिती नाही. पण अमेरिका हे विचारात घेत नाही.

विचार करता कळते की, जगातील सर्वच संघर्ष त्या त्या राष्ट्रांची शक्ती आणि उद्दिष्ट यांचे प्रमाण व्यस्त असल्यामुळे होत आहेत. आज जगातील सर्व महत्त्वाच्या देशांचे (यात भारतही सहभागी आहे) नेतृत्व घड्याळाचे काटे फिरवण्याची इच्छा ठेवून आहे. ट्रम्प यांना १९५० च्या दशकातील अमेरिकेचे वर्चस्व परत आणायचे आहे. म्हणूनच मग त्याला 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' हे गोंडस नाव दिले जात आहे. परंतु आज जागतिक परिस्थिती आमूलाग्र बदलली आहे. इकडे रशियामध्ये राष्ट्रपती पुतीन यांना सोव्हिएत संघाप्रमाणे रशिया हा पुन्हा एक महाशक्ती म्हणून उभा करायचा आहे. परंतु, सोव्हिएत संघाचे विघटन झाल्यानंतर उर्वरित रशियाची साधनसामग्री, मनुष्यबळ आणि आर्थिक सामर्थ्य केवळ एक तृतियांश राहिले आहे. चीनमध्ये शी जिनपिंग यांना हजार वर्षांपूर्वीचे जुने चीनी साम्राज्य उभे करायचे आहे. म्हणूनच आज चीन भारताच्या सीमाभागांवर तसेच दक्षिण चीन समुद्रावर दावा करत आहे. म्हणजेच पुतीन आणि ट्रम्प यांना बदललेल्या परिस्थितीशी जुळवून घेता येत नाही. तीच गत शी जिनपिंग यांचीही आहे. भारतामध्ये मोदींना रामराज्य परत आणायचे आहे. परंतु, मध्यंतरीच्या हजार वर्षांच्या काळामध्ये देशाच्या सामाजिक परिस्थितीमध्ये झालेला आमूलाग्र बदल लक्षात घेता भारत हे हिंदू बहुसंख्य राष्ट्र असले तरी हिंदू राष्ट्र कधीच होऊ शकत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे देशाच्या २० टक्के लोकसंख्येचा या कल्पनेला विरोध आहे. अशा प्रकारे हे उद्दिष्टदेखील सद्यस्थितीत तसेच भविष्यकाळातही साध्य न होणारे आहे. जागतिक नेतृत्वांची ही विचारसरणी जगातील अस्थिरतेच्या तसेच अशांततेच्या मुळाशी आहे. येत्या वर्षात यात काही बदल होण्याची शक्यता दिसत नाही. पण विचारसरणी बाजूला ठेऊन जागतिक नेतृत्वाने यथार्थवाद आपलासा केला तर मात्र येत्या काळात जगात शांतता नांदू शकते.

# ऑनलाईन सेवेच्या उपकरणांची प्रतिक्षा



प्रमोद जाधव

महसूल विभागाचे कामकाज गतीमान व्हावे, यासाठी शासनाने नऊ वर्षापुर्वी ऑनलाईन सेवा सुरु करण्यावर भर दिला. सर्व शासकीय कामकाज पारदर्शक व जलद गतीने व्हावे, यासाठी ऑनलाईन काम सुरु करण्यात आले. या कामांसाठी डिजीटल सिग्नेचर सर्टीफिकेट उपकरण देण्यात आले. परंतू ती उपकरणे जीर्ण झाल्याने नवीन लॅपटॉप व स्कॅनर प्रिंटर मिळावेत अशी शासन स्तरावर मागणी आहे. परंतु शासन याला गांभीर्याने घेत नसल्याने महाराष्ट्र राज्य तलाठी संघाच्या वतीने राज्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार टाकला होता.डिएससी उपकरणे जमा केली. परंतु अद्यापर्यंत शासनाकडून त्यांच्या मागणीची दखल घेण्यात आली नाही. एका बाजूला ऑनलाईनचा दिखावा शासनाकडून होत असताना दुसऱ्या बाजूला कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे शासनाने मंडळ अधिकारी, तलाठी यांच्याप्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

सातबारा फेरफार नोंदणी, पीक पाहणी आदी कामे गतीमान व्हावीत, यासाठी शासनाने ऑनलाईन सेवेवर भर दिला. पंचनामा प्रणालीसह ई हक्क, सातबारा वाटप आदी कामे कार्यक्षमतेने प्रदान करण्यासाठी संगणकीकृत साधन सामुग्री तलाठी तथा ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना देण्यात आली. २०१६पासून ही प्रक्रीया राबविण्यात आली. लॅपटॉप व प्रिंटर ही २०१६ ते २०१९ दरम्यान उपलब्ध करण्यात आली आहेत. त्यामुळे ही सामुग्री कालबाह्य झाले आहेत. सातबारा व आठ अ व फेरफार यांच्या नक्कल वितरणाची ठरवून दिलेली फी ग्राम महसूल अधिकारी दर महिन्याला शासन जमा करीत आहेत. आयटी उपकरणांचे आयुष्यमान पाच वर्षे इतके असल्याचे शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आले आहे. परंतू या उपकरणांचा कालावधीत अधिक झाला आहे. ही उपकरणे कालबाह्य व नादूरुस्त व निकृष्ट अवस्थेत आहेत. या उपकरणांची कार्य गती फारच कमी आहे. पंचनामा प्रणालीसह ई हक्क सारख्या सुधारीत प्रणालींवर कामे करणे अशक्य होत नाही. त्यामुळे ऑनलाईन सेवा वेळेत देताना अडचणी निर्माण होत आहेत. प्रचंड कामकाजाच्या ताणामुळे कर्मचारी वर्गात मानसीक तणाव व असंतोष निर्माण होत आहे. त्याचा आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे नवीन उपकरणे देण्यात यावी अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. शासन निर्णय असूनही उपकरणे खरेदी प्रक्रीया रखडल्याचे चित्र आहे. शासनाच्या धोरणाचे यातून उल्लंघन होत असल्याचा आरोप तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याकडून करण्यात आला आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या महाराष्ट्र राज्य तलाठी संघाच्या वतीने संपूर्ण राज्या ऑनलाईन कामकाज पुर्णतः बंद करण्याची भुमिका घेतली आहे. त्याची कार्यवाही सोमवार (दि. १५) पासून सूरू केली आहे. रायगड जिल्ह्यातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला आहे. जिल्ह्यातील सहाशेहून अधिक तलाठी व मंडळ अधिकारी यांनी ऑनलाईन कामावर बहिष्कार टाकत नवीन उपकरणे देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी जिल्ह्यातील तहसीलदार यांना डीजीटल सिग्नेचर सर्टीफिकेट यंत्र देण्यात आली. रायगड जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार टाकला. हे काम बंद ठेवण्यात आले आहे. त्यामुळे ई पिक पाहणी, ई हक्क ई पंचनामाा, फेरफार, सातबारा आदी ऑनलाईन कामांवर त्याचा परिणाम झाल्याची माहिती समोर आली आहे. शासन निर्णयानुसार नवीन लॅपटॉप व प्रिंटरची जीईएम पोर्टलद्वारे खरेदी प्रक्रीया तात्काळ सुरू करून सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना तातडीने उपलब्ध करून द्यावे. कालबाह्य उपकरणांच्या विल्हेवाट प्रक्रीया त्वरित पूर्ण करण्यात यावी. खरेदी प्रक्रीयेतील अनावश्यक विलांबाबाबत विभागीय स्तरावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. अशा अनेक मागण्यांसाठी मंडळ अधिकारी व तलाठी यांनी आंदोलन केले. निवेदनेही देण्यात आली. मात्र अजूनपर्यंत त्यांच्या आंदोलनाची दखल घेण्यात आली नाही. असाच प्रकार राहिल्यास आगामी काळात ऑनलाईन सेवेचा बोजवारा उडण्याची भिती व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी घटकाचा विचार करून नवीन उपकरणे देण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे अशी मागणी होत आहे. नव्या वर्षात ही उपकरणे मिळतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

लोकसंसद

## सरत्या वर्षातील सरकारचा सर्वात महत्वाचा निर्णय!



२०२५ हे वर्ष निरोप घेत असताना या वर्षात आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अनेक आमूलाग्र बदल दिसून आले आणि २०२६ या वर्षात आधुनिक तंत्रज्ञान अधिक मोठी झेप घेणार हे नक्की. अत्यंत वेगाने बदल होत असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), बिग डेटा, इंटरनेट ऑफ थिंग्ज, मशीन लर्निंग, रोबोटिक्स, थ्री डी प्रिंटिंग, जैव तंत्रज्ञान, नॅनो टेक्नॉलॉजी, चॅटबॉट, अक्षय ऊर्जा तंत्रज्ञान आणि ड्रोन तंत्रज्ञान यांसारख्या तंत्रज्ञानाचा समावेश आहे. त्यापैकी सर्वात चर्चेत असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आता कृषी, आरोग्य, उद्योग, व्यवसाय, शिक्षण, बँकिंग आणि फायनान्स अशा सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे सध्याच्या काळातील सर्वात अधिक परिवर्तनशील तंत्रज्ञानापैकी एक असल्यामुळे त्याचा आपल्या दैनंदिन जीवनावर सर्वाधिक प्रभाव पडत आहे. अशा प्रकारे सर्वच क्षेत्रांमध्ये वाढणारा कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव लक्षात घेऊन तसेच या तंत्रज्ञानातील माहिती, तपशील व बारकावे उमलत्या वयापासूनच विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे अवगत व्हावेत यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून देशभरातील शाळांमध्ये तिसऱ्या इयत्तेपासून म्हणजेच प्राथमिक शिक्षणातच कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाचा समावेश करण्यात येणार आहे. शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल घडवण्याच्या दृष्टीने कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाचा प्राथमिक शिक्षणातच समावेश करण्याचा सरकारचा निर्णय २०२५ या सरत्या वर्षातील सर्वात महत्वाचा निर्णय म्हणावा लागेल.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# वादाशिवाय साहित्य संमेलन व्हावे!

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन १ ते ४ जानेवारी दरम्यान सातारा येथे मराठी भाषेतील ज्येष्ठ लेखक पानिपतकार विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या संमेलनाची तयारी पूर्ण झाली असून साहित्य रत्नांचे स्वागत करायला सातारा नगरी सज्ज झाली असून या संमेलनाची कार्यक्रम पत्रिकाही नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. तब्बल ३२ वर्षानंतर सातारा येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. सातारा हे केवळ ऐतिहासिक वारसा आणि निसर्गसौंदर्यासाठीच प्रसिद्ध नाही तर साहित्य आणि कला यांचे केंद्र म्हणूनही प्रसिद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेले हे शहर मराठी साहित्याच्या या महाकुंभाचे आयोजन करण्यास सज्ज झाले आहे. राज्य सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री असलेले शिवेंद्रराजे भोसले हे या साहित्य संमेलनाचे संमेलनाचे स्वागताध्यक्ष असून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजितदादा पवार हे देखील या साहित्य संमेलनाला उपस्थित राहणार आहे. हे साहित्य संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा व मावळा फाऊंडेशन यांच्या मार्फत आयोजित केले जात आहे. या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने राजकीय नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. राजकीय नेत्यांसोबत साहित्य रसिकही या संमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशातील अनेक राज्यातून म राठी साहित्य रसिक या साहित्य संमेलनाला हजेरी लावेल असा विश्वास आयोजकांना आहे. साताऱ्यात होणारे हे साहित्य संमेलन मराठी साहित्य रसिकांना पर्वणीच ठरणार आहे. यावेळच्या साहित्य संमेलनाला मोठ्या प्रमाणात रसिक भेट देतील यात शंका नाही त्यामुळेच साताऱ्यात होणारे हे साहित्य संमेलन ऐतिहासिक ठरेल यात शंका नाही. या साहित्य संमेलनात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चा तसेच भरगच्च कार्यक्रम होणार आहे. संमेलनाचेअध्यक्ष विश्वास पाटील यांच्या भाषणाकडे साहित्य वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. संमेलनात सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे तसेच अनेक ठराव करण्यात येणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याने या साहित्य संमेलनाचे वेगळे महत्व आहे त्यामुळेच हे साहित्य संमेलन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. साहित्य संमेलन आणि वाद हे समीकरण गेल्या काही वर्षापासून बनले आहे. हे समीकरण यावेळी तरी बदलावे, या साहित्य संमेलनाला कोणत्याही वादाचे गालबोट लागू नये अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. अजून तरी या साहित्य संमेलनाविषयी कोणताही वाद उत्पन्न झाला नाही ही आनंदाची बाब आहे. असेच वादाविना साहित्य संमेलन पार पडावे. साहित्य संमेलन म्हणजे सारस्वतांचा मेळा वारकरी ज्या प्रमाणे पंढरपूरची वारी न चुकता करतात त्याप्रमाणे साहित्यिकही न चुकता संमेलनाला हजेरी लावतात. साहित्य रसिकही साहित्यिकांचे मत, विचार, चर्चा ऐकण्यासाठी आतुर असतात पण दरवेळी नको त्या विषयावर वाद होतो आणि त्या वादाच्या छायेतच साहित्य संमेलन पार पडते. त्यामुळे साहित्य संमेलनाचा मूळ उद्देशच भरकटतो. माध्यमात देखील त्या वादावरच चर्चा होते त्यामुळे साहित्य रसिकांचा मोहभंग होतो. त्यामुळे वादा शिवाय साहित्य संमेलन पार पडेल याची दक्षता आयोजकांनी घ्यावी. याशिवाय संमेलन आणखी लोकप्रिय होऊन तरुणाई या साहित्य संमेलनाकडे कशी आकर्षित होईल याचाही विचार आयोजकांनी करावा. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला मनापासून शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार, ठाणे**

# पीएसआयसाठी वयोमर्यादा वाढवावी

## ● महाराष्ट्र काँग्रेसकडून महायुती सरकारला आंदोलनाचा इशारा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

पीएसआय (पोलीस उपनिरीक्षक) पदासाठी वयोमर्यादा वाढविण्याच्या मागणीसाठी हजारो उमेदवार गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. मात्र महायुती सरकारच्या अकार्यक्षमतेमुळे, दिरंगाईमुळे आणि निर्णयक्षमता अभावामुळे आजही या अत्यंत संवेदनशील व न्याय्य मागणीवर कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. परिणामी हजारो पात्र, मेहनती आणि प्रशिक्षित तरुण वयोमर्यादेबाहेर फेकले गेले असून त्यांच्या भविष्याशी थेट खेळ केला जात आहे. हा केवळ अन्याय नसून लाखो युवकांची उघड




फसवणूक आहे.

पीएसआय परीक्षेसाठी उमेदवारांनी वर्षानुवर्षे कठोर परिश्रम, आर्थिक गुंतवणूक, शारीरिक तयारी आणि मानसिक तयारी केली आहे. पीएसआय जाहिरात सरकारकडून तब्बल अनेक महिने उशिरा प्रसिद्ध झाली. हा दोष पूर्णपणे सरकारचा आहे. मात्र या प्रशासकीय अपयशाची शिक्षा परीक्षार्थींना दिली जात असून अवाजवी वयोमर्यादेमुळे पात्र उमेदवारांना संधी नाकारली जात आहे. हा घोर अन्याय तात्काळ थांबवला गेला पाहिजे.

महाराष्ट्र काँग्रेस पक्षाची स्पष्ट आणि ठाम मागणी आहे की, पीएसआय पदासाठी तात्काळ १ वर्ष वयोवाढीचा जीआर जाहीर करावा आणि वयोमर्यादेची गणना ०१ जानेवारी २०२५ प्रमाणे करण्यात यावी. आत्तापर्यंत सर्वच पक्षांच्या ९० पेक्षा अधिक लोकप्रतिनिधींनी या मागणीसाठी सरकारकडे लेखी पत्रे सादर केली आहेत. मात्र तरीही सरकारने निर्णय घेतलेला नाही, हे अत्यंत दुर्दैवी आहे.

जर सरकारने तात्काळ निर्णय घेतला नाही, तर काँग्रेस पक्षाच्या वतीने पुणे शहरात तीव्र, व्यापक आणि रस्त्यावर उतरून आंदोलन छेडले जाईल. या आंदोलनातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी महायुती सरकारची असेल.

तरुणांचा संयम आता संपत चालला आहे. वेळेत निर्णय न घेतल्यास सरकारला याचे गंभीर राजकीय व सामाजिक परिणाम भोगावे लागतील.

### विद्यार्थ्यांचे नुकसान

या विलंबामुळे गेल्या ३-४ वर्षांपासून तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय अवघ्या काही दिवसांनी किंवा महिन्यांनी वाढल्यामुळे ते अपात्र ठरत आहेत. परिणामी हजारो पात्र, मेहनती आणि प्रशिक्षित तरुण वयोमर्यादेबाहेर फेकले जात असून त्यांच्या भविष्याशी खेळ केला जात आहे.




## ज्ञानवर्धिनी हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन

**| रसायनी | प्रतिनिधी |**

सावळे येथील ज्ञानवर्धिनी हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला परिसरातील मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आणि प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती गजानन माळी उपस्थित होते. तसेच इंडेमित्सू कंपनीचे मॅनेजर गोपाळ सुरवसे, काशीनाथ कांबळे, एम.डी. माळी, मुख्याध्यापक प्रशांत मोकल यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रामभाऊ पाटील, जयदास पाटील, माजी प्राचार्य पी. एल. गायकवाड, घोडके सर, संचालक पालवे सर आणि प्राचार्य प्रकाश माळी यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सरपंच प्रफुल्ल माळी, बळीराम कांबळे, या सोहळ्याला सावळे गावाचे पंचायत सदस्य, ग्रामस्थ,

## प्रदीप पवारांची गरूड झेप

### विभागस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने राज्यातील सर्व शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तसेच पर्यवेक्षकीय यंत्रणेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. हा महत्त्वकांक्षी उपक्रम महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाकडून राबविण्यात आला होता. यामध्ये विज्ञान व गणितचा जादूगार या स्पर्धेत रायगड जिल्हा परिषद केंद्रीय शाळा धारवली ता. पोलादपूरचे मुख्याध्यापक प्रदीप पवार यांनी मुंबई विभागातून प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत मुंबई विभागातून मुंबई, मुंबई



उपनगर, ठाणे, पालघर व रायगड या पाच जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला असून राज्यस्तरीय स्पर्धे करीता त्यांची निवड झाली आहे.

शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला प्रोत्साहन देऊन शिक्षकांना २१ व्या शतकातील कौशल्यासाठी सुसज्ज करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शैक्षणिक प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करणे, समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच डिजिटल भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

मुंबई विभागस्तरीय स्पर्धेचे आयोजन आय.डी.यू.बी.एस. हिंदी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज भांडुप (पश्चिम)या ठिकाणी विद्याप्रधिकरण मुंबई यांच्याकडून करण्यात आले होते.

## गड किल्ल्यावर राहणार दुर्गरक्षकांची नजर

**| मुंबई | प्रतिनिधी |**

गड किल्ल्यांवर सुरक्षितता आणि सांस्कृतिक ऐतिहासिकता संवर्धनाच्या उद्देशाने, ३१ डिसेंबर रोजी गड किल्ल्यावर हुल्लडबाजी, विक्षिप्त वर्तन करणाऱ्यांवर दुर्ग रक्षकांची करडी नजर असणार आहे.

गड किल्ले निव्वळ वास्तू नाहीत, ते आपल्या पूर्वजांच्या त्यागाचे आणि पराक्रमाचे स्मारक आहेत. महाराजांनी स्वराज्यासाठी कष्टाने उभारलेल्या या ठिकाणी नाचगाणी आणि पार्ट्या करून त्यांचा अपमान करू नका. प्रत्येक गडावर पाऊल ठेवताना त्याच्या मातीला नमन करा आणि त्यागाचा इतिहास समजून घ्या. गड किल्ले मौजमजेसाठी नव्हेत, तर प्रेरणा घेण्यासाठी आहेत. त्यांना साजरे




करा, पण त्यांच्या पवित्रतेला मलीन करू नका. पोलीस प्रशासनाने सतर्क राहून गैरवर्तन करणाऱ्या समाज कंटकांवर व हुल्ल्लडबाजांवर कारवाई करावी, असे आवाहन साद सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रतिक मोरे यांनी केले आहे.

स्थानिक नागरिकांमध्ये गड किल्ल्यांची जपणूक आणि संस्कृतीचे रक्षण याबाबत प्रशासनाने तसेच समस्त दुर्गरक्षकांनी सतर्क राहून उपाययोजना राबवाव्यात.

## चिकू उत्पादकांचे आर्थिक नुकसान

**| पालघर | प्रतिनिधी |**

पालघर जिल्हा हा राज्यातील चिकू उत्पादनाचे प्रमुख केंद्र आहे. उत्तर हिंदुस्थानात पालघरच्या चिकूला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. मात्र चिकू वाहतुकीसाठीची किसान रेल सेवा कोरोना काळापासून बंद आहे. कोरोना गेला तरी अजूनही किसान रेल सेवा सुरू करण्यात रेल्वे प्रशासन गांभीर्य दाखवत नाही. त्यामुळे चिकू उत्पादकांची नाकाबंदी झाली असून त्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

किसान रेल बंद करून शेतकऱ्यांचा आर्थिक कणा या सरकारने मोडल्याचे हतबल झालेले चिकू बागायतदार सांगत आहेत. डहाणूसह वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा, तलासरी या भागातील हजारो शेतकरी चिकू बागायतदार आपला चिकू रेलद्वारे पाठवत होते. सरकारी योजनेमुळे चिकूवर रेल्वे मालवाहतूक शुल्क कमी असल्याने ते बागायतदारांना परवडत होते. किसान रेल बंद झाल्याने दिल्ली, गुजरात, उत्तर हिंदुस्थानच्या बाजारपेठांपर्यंत चिकू पोहोचण्यात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. किसान रेल बंद झाल्याने पालघर जिल्ह्यातील चिकू बागायतदारांची आर्थिक गणिते कोलमडली आहेत. तातडीच्या सरकारी हस्तक्षेपाची गरज निर्माण झाली आहे. किसान रेल सुरू करा किंवा पर्यायी रेल्वे व्यवस्था करण्याची गरज असल्याचे पालघर जिल्हा चिकू उत्पादक संघाचे केतन पाटील यांनी सांगितले.

## लक्ष्मीबाई लोखंडे यांचे निधन

**| धाटाव | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील किल्ला गावच्या रहिवासी तसेच रोहा तालुका शिवसेना माजी तालुकाप्रमुख विष्णू लोखंडे यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई तुकाराम लोखंडे यांचे नुकतेच बुधवारी (दि.२४) वृद्धापकाळाने निधन झाले. निधनासमयी त्याचे वय ९४ वर्ष होते. त्यांच्या अंत्ययात्रेस प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. यावेळी उपस्थित सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यासमवेत धाटाव कुणबी विभागतर्फे त्यांना भावपूर्ण



श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवार दि.२ जानेवारी २६ रोजी, तर उत्तरकार्य विधी सोमवार दि.५ जानेवारी २६ रोजी किल्ला येथे राहत्या निवासस्थानी करण्यात येणार आहेत.

## रोह्यात केरळ संस्कृतीचा निनाद

### चेंदा मेलम घोषयात्रेने रंगला उत्सव

**| चणेरा | प्रतिनिधी |**

रोहा शहरात केरळातील पारंपरिक आणि प्रसिद्ध असलेली केरळा रहिवाशांची चेंदा मेलम घोषयात्रा मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाली. ढोल-ताशांच्या गजरात, चेंदा मेलमच्या निनादात आणि पारंपरिक केरळी संस्कृतीच्या सादरीकरणामुळे संपूर्ण रोहा शहर उत्सवमय झाले होते.

ही घोषयात्रा म्हणजे केरळातील समृद्ध संस्कृती, परंपरा आणि वाद्यांचे जतन व संवर्धन करून ती लोकांपुढे सादर करण्याचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या रॅलीमध्ये केरळातील पारंपरिक चेंदा, इतर सांस्कृतिक वाद्ये, रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख तसेच विविध देव-देवतांची हुबेहूब सजीव मांडणी करण्यात आली होती. या अनोख्या सादरीकरणामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद घेतला.

अय्यप्पा सेवा संगम ट्रस्ट, रोहा यांच्या माध्यमातून गेल्या २७ वर्षांपासून या कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करण्यात येत आहे. यावर्षीही ही घोषयात्रा मोठ्या दिमाखात, शिस्तबद्ध आणि मंगलमय वातावरणात पार पडली. या कार्यक्रमामुळे केरळा रहिवाशांमधील एकोपा आणि सांस्कृतिक ओळख अधोरेखित झाली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुनील कुमार, सेक्रेटरी मनोहरन ट्रेसुरे, हरिकुमार दास, पी. एस. चाको यांच्यासह ट्रस्टचे इतर सदस्य, तसेच रोहेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**३१ डिसेंबर**

१) श्री. रामचंद्र शंकर लाड
चेंढरे, ३१-१२-१९४५
२) श्रीम. स्वाती शिरीष लेले
अलिबाग, ३१-१२-१९५९

## कृषीवलच्या




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## गोवा बनावटीचे मद्य जप्त

**चिपळूण :** चिपळूण शहरानजीक कळंबस्ते गावच्या हद्दीत लाखोंचे गोवा बनावटीचे मद्य जप्त करण्यात आले. कळंबस्ते गावच्या हद्दीत कळंबस्ते-धामणंद रस्त्यावर रेल्वे फाटकाजवळ एका वाहनात मोठ्या प्रमाणात गोवा बनावटीचे मद्य असल्याची खबर मिळाल्याने उत्पादन शुल्क खात्याला मिळाली होती. माहितीनुसार कारवाई करत तब्बल २ लाख ५८ हजार ९६० रुपये किमतीच्या मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमध्ये गोलन एस् व्हिस्की (गोवा राज्यनिर्मित) या नावाचे ७५० मिलीचे २२ बॉक्स २६४ बाटल्या, ९० हजारांची एक मारुती ८०० गाडी जप्त करण्यात आली. याप्रकरणी प्रवीण गणपत तांबिटकर (रा. वालोपे तांबिटकरवाडी) याला ताब्यात घेण्यात आले आहे.

## रेल्वे स्थानकात उभारणार लिफ्ट

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

कोकण रेल्वेच्या मार्गावर राजापूर तालुक्यातील एकमेव असलेले राजापूर रोड रेल्वे स्थानक खोलगट भागात असल्यामुळे चढ उतार करण्यासाठी प्रवाशांना त्रास होत होता. ही बाब लक्षात घेऊन कोकण रेल्वे प्रशासनाने लिफ्टची व्यवस्था करावी, अशी मागणी मागील अनेक वर्षे पंचक्रोशी ग्रामविकास समितीच्या माध्यमातून लेखी पत्र व्यवहाराद्वारे कोकण रेल्वे प्रशासनाकडे सुरु होती. प्रशासकीय समिती प्रमुख आदिनाथ कपाळे आणि त्यांचे सहकारी सातत्याने पाठपुरावा करीत होते. अखेर त्या प्रयत्नांना यश आले. कोकण रेल्वे प्रशासनाने राजापूर रोड स्थानकात लिफ्टसाठी ६० लाखाची निविदा अधिकृतपणे जाहीर केली असल्याची माहिती आदिनाथ कपाळे यांनी दिली. यामुळे वृद्ध, अपंग तसेच ज्येष्ठ नागरीकांना याचा फायदा होणार आहे.

## नववर्षाच्या अनुषंगाने अग्निसुरक्षेबाबत मार्गदर्शक सूचना | डॉ. अश्विनी जोशी यांचे आवाहन

# सजग, सतर्क राहून उत्साह साजरा करा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

नववर्ष स्वागताच्या निमित्ताने मुंबईतील विविध हॉटेल्स, पब, बार, गृहसंकुल व इमारती, समुद्रकिनारा आदी ठिकाणी विविध कार्यक्रम व स्वागत सोहळ्यांचे आयोजन केले जाते. यासाठी नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येतात. या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलाकडून अग्निसुरक्षेबाबत विविध आस्थापना आणि कार्यक्रमांच्या आयोजकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. नागरिकांनी नववर्षाचा उत्साह



साजरा करताना सजग व सतर्क रहावे, असे आवाहन अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांनी केले आहे.

**आस्थापना, कार्यक्रम आयोजकांसाठी सूचना :**

अग्निसुरक्षा उपकरणे (अलार्म, अग्निशामक, स्प्रिंकलर, राईझर इ.) कार्यान्वित व सुस्थितीत ठेवावीत, सुरक्षित बाहेर पडण्याचे मार्ग पूर्णपणे मोकळे ठेवावेत; दरवाजे कुलूपबंद करू नयेत, दिशादर्शक फलक लावावेत, स्वयंपाक घरातील गॅस जोडण्या व विद्युत यंत्रणा तपासून सुरक्षित ठेवाव्यात, अतिरिक्त एलपीजी साठवण करू नये, क्षमतेपेक्षा जास्त लोकांना प्रवेश देऊ नये तसेच फटाके, आतषबाजी, फायर गेम, धूम्रपान, हुक्का यांना सक्त मनाई करावी.

तसेच, सजावटीसाठी ज्वलनशील साहित्याचा अतिरेक टाळावा व अग्निप्रतिबंधक साहित्य वापरावे, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम-२००६ नुसार, अग्निसुरक्षा उपाययोजना राबविणे बंधनकारक आहे, अशा मार्गदर्शक सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलाकडून आस्थापना/कार्यक्रमांचे आयोजकांसाठी जारी केल्या आहेत.

तसेच, सजग आणि सतर्क राहून नववर्षाचा उत्साह साजरा करण्याचे आवाहन अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांच्याकडून नागरकांना करण्यात आले आहे.

### नागरिकांसाठी आवाहन

*कार्यक्रमाच्या ठिकाणी अति गर्दी टाळावी, कार्यक्रमस्थळी बाहेर पडण्याचे मार्ग आधीच जाणून घ्यावेत, इमारत/आस्थापना किंवा कार्यक्रमाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची फटाक्यांची आतषबाजी, शोभेचे दारूकाम, फायर गेम, विविध प्रकारे धूम्रपान, हुक्कापान करू नये तसेच, संबंधित आस्थापनेने अग्निसुरक्षा नियमांचे पालन केले आहे का, याची खात्री करावी.*

## निवडक




### महावितरण दैनंदिनीचे प्रकाशन

**मुंबई :** महावितरणच्या २०२६ या वर्षाच्या दैनंदिनीचे मंगळवारी (दि.३०) मुंबईतील फोर्ट येथील एचएसबीसी कार्यालयात उत्साहात प्रकाशन करण्यात आले. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते ही दैनंदिनी प्रकाशित करण्यात आली. याप्रसंगी संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (वित्त) अनुदीप दिघे, संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक आणि संचालिका ज्योती चिमटे यांची प्रमुख उपस्थिती होती. केवळ तारखा आणि वार पाहण्यासाठीच नव्हे, तर प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठीही दैनंदिनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. या दैनंदिनीमध्ये महावितरणच्या राज्यभरातील क्षेत्रीय कार्यालये व अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक, महावितरणची वाटचाल व कामगिरी यांच्या माहितीचा समावेश आहे. या दैनंदिनीमुळे कामकाजात समन्वय राखणे सोपे होणार आहे.

### सुभाष राठोड यांची निवड

**रसायनी :** महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभागातर्फे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे आयोजित विविध स्पर्धा सुरू आहेत. त्यातील वादविवाद स्पर्धेत राजिप ग्रामीण उत्कृष्ट उच्च प्राथमिक शाळा वडगावचे उपक्रमशील शिक्षक सुभाष राठोड



यांची केंद्र, तालुका व विभागात उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंवाई, पालघर या जिल्ह्यातून मुंबई विभागातून राज्यस्तरावर निवड झाली आहे. त्यामुळे त्यांचे जिल्हाभर कौतुक होत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सुभाष राठोड यांच्याबरोबरच मुंबई महापालिकाचे किसन मोरे, पालघरच्या वाकपट्टू प्रतिभा कदम, नवी मुंबईच्या आरती औचर व रायगड माणगावच्या अपूर्वा जंगम यांची सुद्धा राज्य स्तरासाठी निवड करण्यात आलेली आहे. सुभाष राठोड यांचे विशेष कौतुक यासाठी होत आहे की, त्यांचा अलीकडेच जीवघेणा अपघात झाला होता. मात्र तरीही त्यांनी चार स्पर्धेत भाग घेत चारही ठिकाणी अव्वल बक्षीस जिंकलेली आहेत.

### पर्यटकांच्या सुरक्षेसाठी प्रशासन सज्ज

**रत्नागिरी :** सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक रत्नागिरी जिल्ह्यात दाखल झाले आहेत. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी रत्नागिरी जिल्ह्याची पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. थर्टी फर्स्ट साजरा करताना होणारी गर्दी आणि कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे आणि अपर पोलीस अधीक्षक बी.बी. महामुनी यांनी कडक बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. या दिवशी मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांची वाहन तपासणी करण्यात येणार आहे. त्याचबरोबर ३१ डिसेंबर ते १ जानेवारी २०२६ दरम्यान २४ तास जल्लोषाच्या कार्यक्रमांचे चित्रीकरण पथकाकडून पोलीस त्यावर बारीक नजर ठेवणार आहेत. सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यास कारवाई करण्यात येणार आहे. यादरम्यान महिलांची छेडछाड होऊ नये, याकरिता जिल्हा पोलीस दलाने महिला पथक तैनात ठेवले आहे. जिल्ह्यात वाहतूक नियोजनासाठी ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात येणार असून मदतीकरिता पर्यटकांनी ११२ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा पोलिसांनी केले आहे.



### मनुस्मृती दहन दिन उत्साहात

**रसायनी :** रसायनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे भारतीय बौद्ध महासभा (उत्तर) जिल्हा शाखा रायगड महिला कमिटीच्या वतीने मनुस्मृती दहन दिन (भारतीय स्त्री मुक्ती दिन) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सामाजिक, वैचारिक व सांस्कृतिक कार्यक्रमाला महिलांसह समाजातील विविध घटकांचा मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सुरुवातीस महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर समता सैनिक दलाची शिस्तबद्ध परड काढून समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायाचा संदेश समाजात पोहोचवण्यात आला. या कार्यक्रमात महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तबगार महिला व कार्यकर्त्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



### थंडी-दवाचा आंबा मोहोरावर परिणाम

**सिंधुदुर्ग :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पाऊस लांबला. आंबा कलमांना चांगलीच पालवीही फुटली. त्यानंतर गेले १५ दिवस कडाक्याची थंडी पडत आहे. अनेक ठिकाणी तापमान १५ अंशापर्यंत खाली आले आहे. आंबा कलमांना मोहोर आला आहे. त्यामुळे थ्रीप्स आणि तुडतुड्याचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून आंबाबागांमध्ये कीटकनाशकांची फवारणी करताना दिसत आहेत. सद्यःस्थितीमध्ये मोहोराने आंबाकलमे फुलून गेली असली तरी, त्या मोहोरावर कणीचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी दिसत आहे. रात्रभर पडणारी कडाक्याची थंडी आणि पहाटेच्यावेळी पडणारे दव याचा प्रतिकूल परिणाम होत असून, मोहोरावर कणीचे अत्यल्प प्रमाण दिसत आहे. त्यामुळे अपेक्षित फळधारणा न झाल्यास फवारणीसह मशागतींवर होत असलेला खर्च वाया जाण्याची भीती बागायतदारांकडून वर्तवली जात आहे.

# निवडक



## तळा येथे कुणबी भवनचे उद्घाटन

**तळा** : तळा तालुक्यातील कुणबी समाजासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या कुणबी भवनाचे उद्घाटन खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या उद्घाटन सोहळ्यास महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे तसेच माजी विधानपरिषद सदस्य अनिकेत तटकरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तळा तालुका कुणबी समाजाचे तालुकाध्यक्ष नामदेव काप होते, तर स्वागताध्यक्ष म्हणून मुंबई तळा तालुका शाखेचे अध्यक्ष यशवंत शिंदे यांनी भूमिका बजावली. यावेळी समाजनेते रविंद्र माडंवकर, तळा नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, रायगड जिल्हा ओबीसी संघटनेच्या महिला अध्यक्षा अक्षरा कदम, मुंबई युवक अध्यक्ष विजय घाडगे, माजी अध्यक्ष नथुराम अडखळे यांच्यासह संघ कार्यकारिणी सदस्य हरिचंद्र म्हातळे, जनार्दन शिगवण, अशोक करंजे, यशवंत मोंढे, सुरेश कावणकर, कृष्णा सुर्वे, रायगड जिल्हा कुणबी समाजाचे सचिव सचिन कदम तसेच लीला पुतलाजी जाधव आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## माजी विद्यार्थ्यांचे गेटटुगेदर

**महाड** : ३० वर्षांनंतर महाडमधील सन १९९४-९५ च्या दहावीच्या बॅचचा गेट-टुगेदर चा कार्यक्रम राऊळ फार्म हाऊस चापगाव येथे पार पडला. या गेटटुगेदरसाठी ११२ जणांनी उपस्थित दर्शवली होती. आतापर्यंत महाडमध्ये झालेल्या इतर गेट टुगेदरपेक्षा सर्वात जास्त संख्या या ग्रुपची होती. या गेट-टुगेदर साठी परदेशा-तूनसुद्धा काही मित्रांनी हजेरी लावली होती. या दिवशी प्रत्येकाचे स्वागत व परिचय देण्यात आला, तसेच दीप प्रज्वलन यतीन टमके व तुषार बुटाला यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमित म्हामुणकर, रुपाली कांबळे व समिधा संसारे चांढवेकर यांनी केले. या कार्यकामात प्रत्येकाला आपली कला सादर करण्याची संधी देण्यात आली. तसेंच प्रत्येकाला रिटर्न गिफ्ट म्हणून डायरी, ट्रॉफी व ग्रुप फोटो देण्यात आला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रमुख आयोजक म्हणून यतीन टमके, महेश नाझरे, तुषार बुटाला, निलेश यादव, संकेत वडके, गणेश लाहोटी, नयनेश सर्कले, अमित म्हामुणकर तसेच मुलींमधून रश्मी राहाळकर, सारिका कुमार यांनी मेहनत घेतली.



## तटकरे विद्यालयाचे वार्षिक संमेलन

**सुतारवाडी** : सु.ए.सो.च्या द.ग. तटकरे माध्यमिक विद्यालय सुतारवाडीचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. २७ डिसेंबर रोजी संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर ग्रामपंचायत येरळचे सरपंच सुरेश जाधव, उपसरपंच कविता तटकरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्ताराम मंचेकर, सामाजिक कार्यकर्ते चिंतामण दळवी, विजय कामतेकर, माणिक सावंत, विजय सावंत, अशोक सुतार, पोलीस पाटील संतोष दळवी, शिक्षक पालक संघटना अध्यक्ष संजय दळवी, महिला अध्यक्ष सुप्रिया कीर्जत, कुडलीचे माजी उपसरपंच उत्तम कामतेकर, जामगाव उपसरपंच गणेश कोदे, शाळा समिती सदस्य बाळकृष्ण कोदे, जे एस डब्ल्यू चे शुभम राऊत, शाळेचे मुख्याध्यापक श्रीराम काळे, स्नेहसंमेलन प्रमुख शिवाजी मोटे, स्नेहसंमेलन उपप्रमुख साक्षी जांभळे, माजी तंटामुक्त अध्यक्ष कृष्णा तटकरे, विजय महाडिक आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी स्नेहसंमेलन प्रमुख शिवाजी मोटे यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला. या विद्यालयाचे मुख्याध्यापक राम काळे यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल येरळ ग्रामपंचायतीच्यावतीने त्यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. रात्री विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

## हृदय तपासणी शिबीर उत्साहात

**सुकेळी** : रोहा तालुक्यातील नागोठणे जवळील जिंदल कंपनीच्या समूहांतर्गत असलेल्या बी.सी. जिंदल रुग्णालयाच्या सौजन्याने तसेच ऐनघर ग्रामपंचायतीचे सदस्य प्रकाश डोबळे यांच्या सहकार्याने सोमवार (दि.२९) रोजी ऐनघर ग्रामपंचायत हद्दीमधील तामसोली गावामध्ये हृदय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकूण ७६ नागरीकांनी लाभ घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरामध्ये जिंदल रुग्णालयातील डॉ. मनीष रायकवार यांच्यातर्फे नागरिकांची मोफत तपासणी करण्यात आली. या शिबिरामध्ये ईसीजी, रक्तदाब, रक्तातील साखरेचे प्रमाण तपासून मोफत औषधे देण्यात आली.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- मंगल ग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ अलिबागमध्ये कामासाठी मूले व मुली पाहिजेत संपर्क - ७८७५९९००९२
- अलिबागमध्ये एका ऑफिसमध्ये कार्यालयीन सहाय्यक पाहिजे. पगार ८०००/- ते १२,०००/- कार ड्राइव्हींग येत असल्यास उत्तम वयोमर्यादा. २५ ते ४५ संपर्क : ८००७८९७८६६
- अलिबागमधील सुपर मार्केटमध्ये कामासाठी मुली/स्त्रिया पाहिजेत. मो. ९३२२८२३४०४
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# पं.स.च्या जुन्या इमारतींना अखेरची घरघर

## कोट्यवधींचा निधी वाया; शासन आणि लोकप्रतिनिधींचे अक्षम्य दुर्लक्ष

**। माणगाव । सलीम शेख ।**

माणगाव शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी उभ्या असलेल्या जुन्या पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारती आज अक्षरशः अखेरच्या श्वासावर आहेत. एकेकाळी प्रशासनाच्या गजबजाटाने न्हाऊन निघालेल्या या इमारती आज ओसाड, जीर्ण आणि भयावह अवस्थेत उभ्या राहिल्या असून, शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीची उघड-उघड उधळपट्टी होत असल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे.



विविध विभागांसाठी इमारत अपुरी पडत असल्याने तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय संकुलाजवळ अत्याधुनिक व सुसज्ज पंचायत समिती कार्यालय उभारण्यात आले. तत्कालीन मंत्री व विद्यमान खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नांतून हा भरीव निधी उपलब्ध झाला. परिणामी, सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी आल्याने सामान्य नागरिकांची कामे अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक झाली. ही बाब निश्चितच स्वागतार्ह असली, तरी त्याचवेळी जुन्या पंचायत समितीच्या इमारतींकडे झालेले दुर्लक्ष मात्र प्रशासनाच्या संवेदनशून्यतेचे जिवंत उदाहरण ठरत आहे. आज जुन्या पंचायत समितीच्या आवारात उभ्या असलेल्या इमारती केवळ नावापुरत्याच अस्तित्वात आहेत.

काही ठिकाणी पाणीपुरवठा योजना आणि आरोग्य विभागाची कार्यालये कार्यरत असली, तरी सर्व शिक्षा अभियान, बचतगट कार्यालये, गट साधन केंद्र, कृषी विभाग, बांधकाम विभाग अशा अनेक महत्त्वाच्या इमारती अक्षरशः जीर्ण झालेल्या अवस्थेत आहेत. छत गळत आहे, भिंतींना तडे गेले आहेत, लोखंडी सळ्या उघड्या पडल्या आहेत. कधीही इमारत कोसळण्याची भीती नागरिकांच्या मनात आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे, अनेक शासकीय कार्यालये आजही खासगी इमारतींमध्ये कोट्यवधी रुपयांचे भाडे देऊन चालवली जात आहेत. डाक पोस्ट कार्यालय, मृदसंधारण विभाग, इतर प्रशासकीय कार्यालये या जुन्या पंचायत समितीच्या इमारती दुरुस्त करून येथे स्थलांतरित केली असती, तर शासनाचा अमाप निधी वाचला असता. मात्र 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' अशी अवस्था येथे स्पष्टपणे दिसून येत आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, या आवारात कोणतेही नियंत्रण नसल्याने अवैधरित्या वाहने उभी राहतात, नको ते धंदे फोफावले आहेत, मद्यपी राजरोसपणे मद्यप्राशन करीत आहेत. ठिकठिकाणी दारूच्या बाटल्या, कचरा, अस्वच्छता पसरलेली आहे. इमारतींवर झाडे-झुडपे वाढली असून, संपूर्ण परिसराला भूतबंगल्याची अवकळा आली आहे. रात्रीच्या वेळी हा परिसर भीतीदायक बनतो.

माणगावसारख्या तालुक्याच्या केंद्रस्थानी असलेल्या या मौल्यवान शासकीय मालमत्तेची अशी दुरवस्था होणे ही केवळ निष्काळजीपणाची नव्हे, तर लोकांच्या करातून उभ्या राहिलेल्या निधीचा अपमान आहे. वेळीच निर्णय घेऊन या इमारतींची दुरुस्ती, पुनर्वापर आणि योग्य नियोजन झाले नाही, तर उद्या या इमारती नामशेष होतील आणि त्यास सर्वस्वी जबाबदार शासन व लोकप्रतिनिधी असतील.

आता तरी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी जागे होऊन या जुन्या पंचायत समितीच्या इमारतींचा शासकीय उपयोगासाठी पुनर्वापर करावा, अशी माणगावकरांची तीव्र अपेक्षा आहे. अन्यथा ही 'घर घर' लवकरच पूर्णपणे कोसळून इतिहासजमा होईल.

## महाडच्या सुदर्शन कंपनीमध्ये वायुगळती

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाडमधील नामांकित सुदर्शन केमिकल्स या कारखान्यामध्ये सायंकाळच्या सुमारास क्लोरीन गॅसची अचानक गळती झाली. ही गळती निदर्शनास येतास काही वेळातच तेथील सुरक्षा पथकाने ती आटोक्यात आणण्यात यश मिळवले.



ज्या ठिकाणी गळती झाली, त्या ठिकाणी प्रत्यक्ष काम करणाऱ्या अफजल मोहम्मद -४२, अशोक रामचंद्र पवार ५३, ओंकार हुंगेकर २५, नरेश विठोबा चव्हाण ४८, सुमन सिंग -३२ या पाच कामगारांना वायूची किरकोळ बाधा झाली. त्यांच्यावर कारखान्याच्या ठिकाणी असलेल्या प्रथमोपचार सेंटरमध्ये उपचार करून सोडण्यात आले. सुदर्शन केमिकल्समध्ये कामगार सुरक्षेबाबत कायम खबरदारी घेतली जाते, यामुळे कामगार सुरक्षेच्या बाबतीमध्ये या कारखान्याचे कायम कौतुक होते. आज झालेल्या घटनेची त्यांनी प्रचिती आणून दिली. कारखान्यांच्या चार्जिंग पॉईंटमधून क्लोरीन टनेलचे गॅस किट लिकेज झाल्यामुळे वायुगळती झाल्याचे कारखाना व्यवस्थापक सुरेश काशीद यांनी सांगितले. येथील सर्व कामगारांना तात्काळ बाहेर काढून सुरक्षित केले. वायुगळती झाल्याची खबर आजूबाजूच्या ग्रामस्थांना कळताच ग्रामस्थांमध्येदेखील भीतीचे वातावरण निर्माण झाले.

- **पाच कामगारांना किरकोळ बाधा**
- **कंपनीच्याच सुरक्षा पथकाकडून गळती आटोक्यात**

त्यांनी कंपनीच्या प्रवेशद्वारावर वाद घालण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत परिस्थिती आटोक्यात आणली होती.

ज्यावेळी कारखान्यामध्ये वायुगळती झाली, त्यावेळी कारखान्यामध्ये जवळपास ४०० कामगार काम करत होते. महाड औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मार्गाची टीमदेखील घटनास्थळी दाखल झाली होती. या घटनेनंतर काही काळ कारखाना बंद ठेवण्यात आला होता. पुढील तपास महाड एमआयडीसीचे पोलीस निरीक्षक जीवन माने करीत आहेत.

## निळकंठ म्हात्रे यांचे निधन

**चिरनेर** : उरण तालुक्यातील खोपटे (म्हात्रे पाडा) येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक निळकंठ धर्माची म्हात्रे (८२) यांचे रविवारी (दि.२८) अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर खोपटे येथील स्मशानभूमीत नातेवाईक, ग्रामस्थांसह विविध क्षेत्रातील मंडळींच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



प्रा. शाळेच्या सेवानिवृत्त शिक्षिका इंदिरा म्हात्रे यांचे ते पती, तर क्रिकेटपटू सुदेश, महेंद्र, हितेंद्र व कन्या प्रियदर्शनी यांचे ते पिताश्री होत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन पुत्र, एक कन्या, सुना, जावई, नातवंडे व पतवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार (दि.६) खोपटे येथील नाना नानी पार्क येथे होईल. तर उत्तरकार्य गुरुवार (दि.८) खोपटे येथील राहत्या घरी होणार आहेत.

## सटुआईच्या यात्रेने व्यापार उदीम वाढला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळजवळील कोलीवली गावात पौष मासारंभाला भरली जाणारी सटुआईची यात्रा एक दिवसाची असायची. मात्र, मागील काही वर्षे या यात्रेने ट्रेंड बदललाय, कारण यात्रा आता १५ दिवसांची होऊ पाहात आहे. दरम्यान, नवस फेडायला येणारे भाविक यांच्या वर्दळीमुळे नेरळ परिसरातील व्यापार उदीम वाढला आहे.

कर्जत तालुक्यातील नेरळ जवळ असलेल्या कोलिवली गावात सटुआईचे मंदिर आहे. त्या मंदिरात दरवर्षी पौष महिन्याचे पहिल्या दिवशी यात्रा भरते. आपल्या बाळाच्या जन्माचे भविष्य सटुआई लिहिते तसेच आपल्या बाळाचे भविष्य उज्ज्वल व्हावे आणि अपत्य व्हावे म्हणूनदेखील विवाहित दाम्पत्य नवस करीत असतात. दरम्यान, ते नवस फेडण्यासाठी




भक्त या यात्रेत मोठ्या संख्येने येत असतात. यावर्षी रविवारी २१ डिसेंबर रोजी सटुआईची यात्रा भरली होती. त्यानंतर दररोज शेकडोंच्या संख्येने भाविक नवस फेडण्यासाठी कोलीवली गावात येत आहेत. कोलीवली यात्रा आता १५ दिवसांची होऊ पाहात असल्याने नेरळ येथून कोलीवली येथे जाणारी प्रवासी वाहने यांचा व्यवसाय वाढला आहे. त्याचवेळी किराणा साहित्य, फळे, हार, पूजेचे साहित्य यांच्या वस्तूंची उलाढाल वाढली आहे.

## शेकापचे निष्ठावान कार्यकर्ते काका माने यांचे निधन

**। कोलाड । प्रतिनिधी ।**



नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य सदानंद धोंडू उर्फ (काका साहेब) माने यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. ते शेतकरी कामगार पक्षाचे एक निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जायचे. १९८० च्या काळात त्यांनी जिल्हा परिषदेचे तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्ष प्रभाकर (भाऊ) पाटील यांच्या खांद्याला खांदा लावून शेकापचा लाल बावटा गावोगावी पोहचविण्याचे कार्य केले. काकासाहेब यांच्या जाण्याने माने परिवारासह नागोठणे विभागात दुःखाचे सावट पसरले आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच अनेकांनी त्यांच्या घरी जाऊन पार्थिवाचे अंतिम दर्शन घेतले. त्यांच्या पश्चात राजेंद्र माने, महेंद्र माने, सुप्रिया जाधव, प्रतीक्षा साळुंखे यांच्यासह सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

## जांभिवलीत 'वनवासी'चा स्थापना दिन उत्साहात

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील जांभिवली येथील केंद्रावर वनवासी कल्याण आश्रम स्थापनादिन वनवासी कल्याण आश्रम डोंबिवलीतर्फे साजरा करण्यात आला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ डोंबिवली प्रताप प्रभात प्रौढ शाखेचे स्वयंसेवक व मुंबई महानगर कार्यकर्त्यांसमवेत हा कार्यक्रम आयोजित केला होता.



केंद्रातील विद्यार्थ्यांनी पद्य सादर केले. केंद्र प्रमुख ईश्वर चौधरी यांनी सर्वांचे स्वागत केले. राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या व वनवासी कल्याण आश्रम कोकण प्रांताच्या माजी अध्यक्षा ठमाताई पवार आणि अजित धोंड यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. चौधरी यांनी जांभिवली केंद्र विद्यार्थी वसतिगृहाबद्दल व तेथील दिनचर्येची माहिती दिली. तसेच वनवासी कल्याण आश्रम वेगवेगळ्या १४ आयामांद्वारे वनवासी समाजात अखिल भारतीय स्तरावर काम कसे करते व त्यांचा त्यांचा सर्वांनी सर्वांगीण विकास कसा करते ते सांगितले.

अजित धोंड यांनी मुंबई पोर्ट ट्रस्टमधील कार्यकर्त्यांनी खेलकूद, शैक्षणिक प्रकल्प असो त्यामुळे मोरगासारखा धावपटू तयार होण्यासाठी योगदान लाभले, असे सांगितले. हेमंत वरळीकर यांनी जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी वनवासी कल्याण आश्रम या सेवेची सुरुवात कोठिंबा या केंद्रावरुन प्रमोद करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली चंदू जोशी, अजित धोंड यांच्यासारख्या तरुण कार्यकर्त्यांच्या रूपाने झाल्याचे सांगितले. वनवासी कल्याण आश्रम वेगवेगळ्या आयामाद्वारे वनवासींचा सर्वांगीण विकास १९५२ पासून साधत आहे. छात्रावास, आरोग्य रक्षक, खेलकूद, हितरक्षा, नगरिया कार्य, ग्राम विकास, शिक्षण, श्रध्दा जागरण आदी उपक्रम केले जातात. दरम्यान, सुहास वाळके यांनी आभार प्रदर्शन केले.

## उरणमध्ये नववर्षाच्या स्वागतासाठी तरुणाई सज्ज

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरणमध्ये सरत्या वर्षाला अलविदा आणि नववर्षाच्या स्वागताची आतापासूनच तरुणाईची जोरदार तयारी सुरू झाली आहे. त्यामुळे तरुणाईने आखलेल्या प्लानमुळे परिसरातील सर्वच हॉटेल्स, रिसॉर्ट, फार्म हाऊस दहा दिवसांपूर्वीच बुक झाल्याने हाऊसफुल्ल झाली आहेत.

उरमधील रानसई धरण, वेश्वी, विंधणे, आक्कादेवीचा डोंगर, इंद्रायणी डोंगर, करंजा परिसर, ऐतिहासिक द्रोणागिरी डोंगर, जेएनपीए परिसर, टाऊनशिप आदी अनेक ठिकाणे तरुणाईची अगदी पसंतीची आहेत. त्याचबरोबर पीरवाडी दर्गा पीरवाडी, माणकेश्वर येथील समुद्राचा फेसाळणारा किनारा, रुपेरी वाळू हौशी पर्यटक व तरुणाईला सदैव साद घालीत असते. त्याचबरोबर मोरा-मुंबई घारापुरीदरम्यान शीतल चांदण्या आणि समुद्र सफरीचा आनंद घेण्यासाठीही दरवर्षी हौशी पर्यटकांची विशेष रेलचेल असते. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी, नवीन वर्षाच्या स्वागतासाठी आणि रात्रभर समुद्र सहलीचा आनंद घेण्यासाठी तरुणाई फारच उत्सुक झाली आहे. यासाठी अनेक बोटींचे बुकिंगही झाले असल्याचे बोट मालकांकडून सांगितले जात आहे.

## 'वाहतूक संघटनेमुळे रोजगार उपलब्ध'

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

तालुक्यात स्थानिकांच्या वाहतूक गाड्यांना रोजगार उपलब्ध व्हावा याकरिता तालुक्यातील सर्व स्थानिक रोजगार करणारे तसेच वाहतुकीची साधना असणारे एकत्र येऊन तालुक्यांमध्ये रोजगार उपलब्ध करण्याकरिता एक नवी क्रांती निर्माण होईल त्यानिमित्ताने तालुक्यामध्ये प्रथमच स्थानिक रोजगार वाहतूक संघटना स्थापन करून त्या संघटनेच्या मध्यवर्ती कार्यलयाचे उद्घाटन निवासी तहसीलदार चंद्रशेखर खोत, पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे, गटविकास अधिकारी माधव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

'वडाखालची शाळा' उपक्रम नाविण्यपूर्ण | मुलांच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न

# कर्जतमध्ये रंगला आदिवासी कला उत्सव

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील पोशीर ग्रामपंचायतीमधील चिंचवाडी येथे वडाखालची शाळा या उपक्रमांतर्गत ठाकर आदिवासी कला महोत्सव आयोजित करण्यात आला होता. सहा दिवसांच्या या ठाकर आदिवासी कला महोत्सवात आदिवासी कला संस्कृतीविषयी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



'वडाखालची शाळा' संकल्पनेतून ठाकर आदिवासी वाडीत सहा दिवसांचा कला महोत्सव आयोजन पोशीर ग्रामपंचायतमधील चिंचवाडी येथे करण्यात आले होते. गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेल्या संध्याकाळच्या शाळेच्या माध्यमातून वाडीतील मुलांच्या अंगभूत कला-गुणांना वाव देणे, त्यांची ओळख निर्माण करणे आणि आत्मविश्वास वाढवणे हे कार्य या संकल्पनेंतर्गत सातत्याने सुरू आहे. मेघा आणि यश (कॅम्पर शेफ) यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जात आहे. त्याचाच पुढचा टप्पा म्हणून या भागात प्रथमच असा कला महोत्सव आयोजित करण्यात आला.



या कला महोत्सवात देवपाडा, उंबरवाडी, गिरेवाडी आणि वाघ्यावाडी येथील शाळांमधील मुलांनीही सहभाग घेतला. विविध कला, खेळ आणि सादरीकरण यामधून मुलांनी प्रचंड आनंद घेतला. वाडीतील मुलांनी आलेल्या पाहुण्यांचा आपुलकीने पाहुणचार केला. झाडांची माहिती, मातीच्या घरांची रचना, ढेंगच्या खेळाची कमाल अशा अनेक बाबी मुलांनी स्वतः पुढाकार घेऊन पाहुण्यांना समजावून सांगितल्या. या कला महोत्सवामागील संकल्पना होती; प्रत्येकाने एकमेकांकडून शिकावे आणि शिकण्यासाठी वयाची कोणतीही अट नव्हती.

वडाखालची शाळा या ठाकर आदिवासी कला महोत्सवाला बाहेरून येणाऱ्या पाहुण्यांपेक्षा वाडीतल्या स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आदिवासी मुलांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या विविध कलावस्तू, नैसर्गिक रंग व स्थानिक साहित्याचा वापर करून संपूर्ण परिसर आकर्षक पद्धतीने सजवला होता. 'वडाखालची शाळा' या संकल्पनेनुसार शिक्षण, कला आणि निसर्ग यांचा सुंदर संगम या महोत्सवात पाहायला मिळाला. चिंचवाडी मधील कार्यकर्ते मनोहर पारधी आणि नारायण पारधी यांनी पखवाज आणि हार्मोनियम वादन सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

मुलांना विविध कला शिकवण्यासाठी देशाच्या विविध भागांतून कलाकार आणि मार्गदर्शक उपस्थित होते.

### कलेला मिळाले व्यासपीठ

**आदिवासी मुलांमध्ये कला असतेच, फक्त त्या कलेला योग्य साथ आणि व्यासपीठ मिळण्याची गरज असते. 'वडाखालची शाळा' ही केवळ शाळा नसून, ती एक परिवर्तनाची संकल्पना आहे. कलेच्या, निसर्गाच्या आणि सहभागात्मक शिक्षणाच्या माध्यमातून मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि शिकण्याची ओढ निर्माण होते. समाजाने अशा संकल्पनांना पाठबळ दिल्यास ग्रामीण व आदिवासी मुलांचे भविष्य अधिक उज्वल होऊ शकते.**

# मध्यप्रदेशातील धार गँगची महाराष्ट्रात दहशत

## रसायनी पोलिसांनी आवळल्या मुसक्या



। खोपोली-रसायनी । प्रतिनिधी ।

रिसगाव व एमआयडीसी कॉलनी सह मोहोपाडा परिसरात सलग झालेल्या घरफोडीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर रसायनी पोलिसांनी परराज्यातील कुख्यात धार गँगचा पर्दाफाश करत मोठे यश मिळवले आहे, अशी माहिती रायगड जिल्हा पोलिस अधिक्षक आंचल दलाल यांनी रसायनी पोलिस ठाण्यात सोमवारी (दि.२९) आयोजित पत्रकार परिषदेत दिली. मध्यप्रदेशसह अनेक राज्यांत सक्रिय असलेल्या या टोळीतील आरोपींना जेरबंद करत पोलिसांनी सुमारे ३ लाख रुपयांचे सोने, रोख दागिने आणि चोरीला गेलेली मोटारसायकल हस्तगत केली आहे. मध्यप्रदेश येथील धार गँग डोंगराच्या बाजूला असणाऱ्या उच्चभ्रूत इमारती गुगलवर सर्च करून बंद घरात घरफोडी करतात. त्यांनी इतर राज्यांसह महाराष्ट्रात देखील दहशत माजवली होती. दरम्यान, त्यांनी रसायनी हद्दीत तीन घरफोड्या केल्या आहेत. या घरफोड्या धार गँगने केल्याची माहिती समोर येताच रायगड पोलिसांनी मध्यप्रदेश व राजकोट-गुजरात येथे स्वतंत्र पथक रवाना करून कौशल्यपूर्ण तपास करीत मध्यप्रदेश आणि कर्नाटकातून दोन आरोपींना पकडण्यात यश आले. दरम्यान, रसायनी पोलीसांनी घटनास्थळाच्या कॅमेरांची पडताळणी केली. त्यावेळी धार गँगची टोळी चोरीचा माल घेऊन पनवेल रेल्वे स्टेशन व बस स्टॅन्डकडे जात असल्याचे दिसून आले. यादरम्यान, एकुण धार गँगमधील चौघांचे फोटो प्राप्त केले. त्यानंतर मध्यप्रदेश येथील पोलिसांशी संपर्क करुन येथील तांडा गांव येथे जाऊन धार गँगचा शोध घेतला. त्यावेळी राजेंद्र उर्फ राजन रमेश बिल उर्फ आलवा, मोटला उर्फ अनिल काळा उर्फ केरु मोहनिया, रायसिंग बायसिंग मोहनिया, प्रकाश बायसिंग आलवा अशी त्या सराईत चोरांची नावे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर प्रकाश बायसिंग आलवा (३२) याला शिताफीने ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून दोन गुन्ह्यातील सोन्याचा सर, नाकातील नथ, सोन्याचा कॉईन व रोख रक्कम असे मिळुन एकुण ३ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे रसायनी येथे घटनास्थळी जुने सिमकार्ड मिळुन आले होते. त्याच्या आधारे व सीसीटीव्ही. फुटेजमध्ये दिसुन आलेले संशईतांचया आधारे धार-मध्यप्रदेश व राजकोट-गुजरात येथे स्वतंत्र पथक रवाना केले होते. त्यामुळे हा गुन्हा सुरेश रमेश शेंगर व त्याच्या ३ मित्रांनी केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या आरोपीचा शोध घेतला असता तो कर्नाटक येथील कारागृहात चोरीच्या गुन्ह्यात अटक असल्याचे निष्पन्न झाले. तसेच, त्याच्या विरुद्ध कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश व तेलगंणा येथे वेगवेगळे चोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली. पोलीस उपनिरीक्षक प्रकाश माळी व त्यांच्या पथकाने कर्नाटक येथुन त्याला ताब्यात घेतले.



# मुरुड समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची गर्दी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

सरत्या वर्षाला निरोप देत नविन नववर्षाच्या स्वागतासाठी मुरुड समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी मोठ्या संख्येने पर्यटकांची गर्दी केली आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी अनेक जण विविध ठिकाणी फिरायला जात असतात. याच पार्श्वभूमीवर मुरुडला पर्यटकांनी चांगली पसंती दिली आसुन पर्यटकांनी समुद्रकिनारे बहरले आहेत. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांची करडी नजर असणार आहे. या करिता पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ३ पोलीस अधिकारी ७० पोलिस कर्मचारी व ३० होमगार्ड यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला असून नविन वर्षाच्या स्वागतासाठी मुरूड समुद्रकिनारावरील हॉटेल, लॉजिंग, रेस्टॉरंट विद्युत रोषणाईने सजल्या आहेत. घोडागाडी, ऊंट स्वारी, बाईक स्वार, सायकलवर स्वारी करणे पर्यटकांनी पसंती केली आहे. समुद्रात उतरताना धोकादायक भागात पोहण्याचा टाळा पोहताना सेफ्टी जॅक्टचा वापर करा असे आवाहन पर्यटकांना पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी केले आहे. रस्तावर वाहतुक व्यवस्था ही विस्कळीत होऊन नये त्याकरिता ट्राफीक पोलिसांची नेमणूक केली आहे. समुद्रकिनारा, सुर्वे नाका, परेश नाका, दस्तुरीनाका, शिघ्रे चेक पोस्ट, ऐतिहासिक जंजिरा किल्ला या ठिकाणी पोलिसाचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे अशी माहिती पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी दिली आहे.

# पनवेलमध्ये अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस सज्ज

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

नववर्षाच्या स्वागतासाठी ३१ डिसेंबरच्या रात्री जागोजागी पार्ट्या होतात. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, मारामारीचेही प्रकार यावेळी घडतात. त्यातच निवडणुकांचा हंगामसुरू असल्याने पोलीस प्रशासनाची चिंता वाढली आहे. थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरात अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रशासनाची देखील तयारी सुरु आहे. थर्टी फर्स्टच्या दिवशी धिंगाणा घातला तर प्रशासनाकडून कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे मद्यप्राशन करून वाहन चालवू नका आणि कारवाईचे संकट स्वतः हून ओढवू नका असे आवाहन केले आहे. मद्यप्राशन करून वाहन चालवल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. ब्रेथ मशीनद्वारे वाहन चालकाची तपासणी करून कारवाई होणार आहे. पनवेल महानगरपालिकेची निवडणूक सुरू असल्याने यंदाची थर्टीफर्स्ट जंगी होणार आहे. पनवेल तालुक्यात अनेक फार्म हाऊस आहेत. या फार्म हाऊसचे यापूर्वीच बुकिंग झालेली आहे. थर्टी फर्स्टच्या दिवशी अनेक जण फार्महाऊसमध्ये जाऊन मौज मजा करतात. नववर्षाचे स्वागत करतात. पनवेल तालुका पोलिसांद्वारे खारपाडा, कोन, नेरे येथे नाकाबंदी असणार आहे. तर पनवेल वाहतूक शाखेतर्फे आदई सर्कल, ठाणा नाका गार्डन हॉटेल सिग्नल, शिवशंभो नाका पनवेल, वडघर नाका, उरण नाका ब्रिज या ठिकाणी नाकाबंदी करण्यात येणार आहे. पनवेल तालुका पोलिसांतर्फे २ पीआय, ८ पीएसआय/एपीआय, ४८ पोलीस स्टाफ असे एकूण ५८ पोलीसांची नजर राहणार आहे.



# चार उमेदवारांची अनामत रक्कम जप्त

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर रोजी संपन्न झाली होती. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार तिचा निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर झाला यामध्ये चारही उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. २१ जागांसाठी त्यामध्ये परिवर्तन विकास आघाडीने २१ महायुतीने २१ असे ४२ उमेदवार उभे केले होते तसेच चार अपक्ष उमेदवारांचा समावेश होता. त्यामुळे नगराध्यक्षापदाचे दोन असे एकूण ४८ जन निवडणूक रिंगणात होते. प्रभाग क्रमांक- ब मधून जयदीप कृष्णा शिंदे हे उभे होते त्यांना १६२ मते मिळाली प्रभाग क्रमांक ५ ब मधून उमेश अर्जुन शेलार हे उभे होते त्यांना ९ मते मिळाली प्रभाग क्रमांक ९ अ मधून राजेश पिराजी साळुंके हे उभे होते त्यांना २० मते मिळाली तर प्रभाग क्रमांक १० ब मधून नितेश राजेंद्र बाचल यांना २४६ मते मिळाली या चारी उमेदवारांची महाराष्ट्र निवडणूक नियमानुसार उमेदवार निवडून न आल्यास त्यास मिळालेल्या वैध मतांची संख्या सर्व उमेदवारांना मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येच्या एक अष्टमांशपेक्षा अधिक होत नसेल तर त्यांची अनामत रक्कम नगर परिषदेकडे जमा राहते यानुसार या चारही उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली बिनशेती जमीन मिळकत आमचे अशील यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक १.अंजना श्रीकांत चौधरी, २. श्रीकांत तोडरमल चौधरी, यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

-: बिनशेती मिळकतीचे वर्णन :-

| सर्व्हे नंबर | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|
| १८ | ३३.००.०० या एकूण क्षेत्रापैकी १.अंजना श्रीकांत चौधरी, २. श्रीकांत तोडरमल चौधरी यांचे हिस्स्याचे भोगवटा सदरी नावे असलेले ५.००.०० (५ गुंठे) इतके क्षेत्र विकत देणेचे ठरले आहे. | ५०.०० |

सदरहू जमीन बिनशेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरक असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचविणे. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. ३१/१२/२०२५ हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी

**शंकेश राजेश ठाकरे**
ऑफिस:- मु.पो.गौरकामत, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९२८४८९२३८७

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक सौ. दया मधुकर ढेबे रा.सत्तेवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत मी खालील सही करणार यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| उमटे ता. अलिबाग | १२७/२/ई | ०-२६-८० पो.ख. ०-०१-३० एकूण ०-२८-१० | ०४.३७ |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून पंधरा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन मी वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करीन व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझेवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/१२/२०२५ सही/-

**श्री. श्रेयस दिलीप पालवकर**
रा. चौल आग्राव-जान्हवी तळे, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे बेलोशी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत व त्या मिळकतीचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहे. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | गट क्रमांक | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| बेलोशी ता. अलिबाग | २५६ | ०.६०.१० | १.३६ |

वर नमुद केलेल्या सदर बिनशेती मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तीने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

अलिबाग,
तारीख : ३०/१२/२०२५

**ॲड. सचिन दिनकर पाटील**
बी. ए. एल. एल. बी मुंबई
२१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२२६८७२६९०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे वावे त हवेली, ता.सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**

मिळकतीचे वर्णन :-

| जमिन मालकाची नांवे | स. नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. अरूण गुलाब गवळी. | ३०/१ | ०-१६-२० | १-९२ |
| श्री.अरूण गुलाब गवळी. | ३०/२ | ०-४३-०० | ७-४४ |
| श्री. अरूण गुलाब गवळी. | ३१/२ | ०-६७-०० | ०-१२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ३१/१२/२०२५ खरेदीदारांतर्फे,

**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ७ पाली, ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

### कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक 31.12.2025**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे. **कामाचे नाव** - वरिष्ठ क्षेत्रीय इंजि/रत्नागिरी सेक्शन अंतर्गत कोणत्याही कंपनीच्या अब्रेसिव्ह रेल कटिंग मशिन्स व रेल ड्रिलिंग मशिन्ससाठी वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-70, अंदाजित खर्च:** ₹15,58,458/-, **ईएमडी** ₹31,200/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 22.01.2026 रोजी दुपारी 15.00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. अर्जुन भीमा फोपे, रा. बलिवरे, पो. नांदगाव, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे बलिवरे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ६२/३ | ०.३२.९० पो.ख ०.०३.०० एकुण ०.३५.९० | ४.२५ | श्री. गणेश परशुराम फोपे |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विकीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ३१/१२/२०२५. सही/-

**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,नानामास्तर नगर,
मुद्रे. मो. नं. ७३८५००४८०६.

### जाहीर नोटीस

सर्व संबंधित व्यक्तींना, इच्छुक खरेदीदारांना, वित्तीय संस्था, बँका, विकासक, बिल्डर, दलाल व सर्वसामान्य जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल १) धनश्री सुरेश घरत २) श्री. राजेश चंद्रकांत घरत ३) सौ. रोहिणी शेखर घरत, ४) गणेश चंद्रकांत घरत ५) सौ. तेजस्वीनी राहूल काठे ६) सचिन श्रीकांत घरत, ७) श्वेता सुरेश घरत, ८) सौ. किर्ती मनिष राउत ९) श्री. दुर्गेश विनायक घरत, १०) कल्याणी विनायक घरत ११) सौ. दिपीका महेश म्हात्रे रा. सासवणे ता. अलिबाग, जि. रायगड यांचे आजोबा श्री. शांताराम गजानन घरत, पणजोबा श्री. गजानन झिप्राजी घरत व चुलत आजोबा श्री. द्वारकानाथ गजानन घरत हे खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे मूळ कायदेशीर मालक असून सदर मिळकतीमध्ये माझ्या अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे.

मिळकतींचे संपूर्ण वर्णन

| गाव | जुना सर्व्हे नं. | क्षेत्र | भूमापन क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| मौजे सासवणे ता. अलिबाग, जि. रायगड | २४/२ | ०-२७-६० | ६७/१ | ०-२१-६० |
| | २५/१ | ०-१६-१० + पो.ख.०-००-८० | ६७/२ | ०-२१-५० |

वरीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतींचे आजतागायत कोणतेही सरस-निरस वाटप, कायदेशीर विभागणी, हस्तांतरण, विक्री, गहाण, करारनामे किंवा अन्य कोणताही व्यवहार वैधरीत्या झालेला नाही, तसेच यापूर्वी सदर मिळकतींच्या बाबत नोंदविण्यात आलेले दस्त बेकायदेशीर असून ते माझ्या अशिलांवर बंधनकारक नाहीत त्यामुळे सदर मिळकती संदर्भात सर्व सहहक्कदारांचा संयुक्त, अविभक्त व अजूनही अस्तित्वात असलेला हक्क कायम आहे.

असे असताना सदर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर बेकायदेशीररीत्या नावे दाखल असलेल्या काही व्यक्ती सदर मिळकती अथवा त्यामधील अविभक्त हिस्सा त्रयस्थ व्यक्तींना विक्री, विकास, गहाण, पॉवर ऑफ अटर्नी, करारनामे, अथवा कोणत्याही स्वरूपाचा बेकायदेशीर व्यवहार करण्याच्या तयारीत असल्याची खात्रीलायक माहिती आम्हाला प्राप्त झाली आहे.

म्हणून या जाहीर नोटीसीद्वारे सर्व संबंधितांना स्पष्टपणे सूचित करण्यात येते की, वरील वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात विद्यमान मालकांशी अथवा इतर कोणत्याही व्यक्तीशी कोणताही व्यवहार केल्यास, तो व्यवहार संपूर्णपणे बेकायदेशीर, शून्य व अवैध ठरेल, तसेच असा व्यवहार करणारी व्यक्ती स्वतःच्या जोखमीवर व जबाबदारीवर तो करीत असल्याचे समजण्यात येईल. अशा व्यवहारामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही नुकसानीसाठी माझे अशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

याव्यतिरिक्त, सदर मिळकतींचे कायदेशीर सरस-निरस वाटप होईपर्यंत जर कोणत्याही व्यक्तीने सदर मिळकतीवर बांधकाम करणे, भूखंड पाडणे, ताबा घेणे, स्वरूपात बदल करणे, सीमांकन करणे, अथवा कोणताही अनधिकृत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्यास, त्याविरुद्ध योग्य दिवाणी तसेच आवश्यकतेनुसार फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येईल, याची सर्वांनी सक्त नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस सर्व संबंधित पक्षांना पूर्वसूचना म्हणून प्रसिद्ध करण्यात येत असून, भविष्यातील कोणत्याही व्यवहारावर किंवा कागदपत्रांवर माझ्या अशिलांचा स्पष्ट आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ३०/१२/२०२५ सही/-

**ॲड. सचिन सदानंद पाटील**
मु. ७६२/ए/बी, आई बंगला, शिवसागर,
वसाहत, कुरूळ ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०९
मो. नं. ९८८१६३७९२४

नि ८/ड
दिवाणी चौकशी अर्ज १९१/२०२५
निशाणी नं.
ने. ता.०५/०२/२०२६
ॲड. नरेश मारूती बैलमारे

**कर्जत येथील मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर कर्जत**
**जाहीर नोटीस**

१) विजय शंकर शिंदे
वय ५३ वर्षे,
रा. घर नं. १०६/१, आंबा माता मंदिराजवळ,
भिसेगाव, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
पिन नं. ४१०२०१. अर्जदार नं. १

२) पुष्पा महादेव जाधव
वय ५५ वर्षे,
रा. रूम नं. ३०२, त्रण पुष्प को. ऑप. हौ. सो.
सह्याद्री नगर १, बिर्ला कॉलेज, कल्याण (प.),
ठाणे-४२१३०१. अर्जदार नं. २

३) ज्योती दिपक शिंदे
वय ४३ वर्षे,
रा. जय अंबे भवानी मंदिराजवळ,
भिसेगाव, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड. पिन नं. ४१०२०१. अर्जदार नं. ३

४) कुणाल दिपक शिंदे
वय २३ वर्षे,
रा. जय अंबे भवानी मंदिराजवळ,
भिसेगाव, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड. पिन नं. ४१०२०१. अर्जदार नं. ४

५) यश दिपक शिंदे
वय २१ वर्षे,
रा. जय अंबे भवानी मंदिराजवळ,
भिसेगाव, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड. पिन नं. ४१०२०१. अर्जदार नं. ५

६) सोहम दिपक शिंदे
वय १४ वर्षे यांचे तर्फे अ.पा.क. आई
ज्योती दिपक शिंदे, वय ४३ वर्षे,
रा. जय अंबे भवानी मंदिराजवळ,
भिसेगाव, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.पिन नं. ४१०२०१. अर्जदार नं. ६

ज्याअर्थी, अर्जदार कर्जत येथील दिवाणी न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक १९१/२०२५ दाखल केला आहे. सदर अर्जामधील अर्जदार नं. १ व अर्जदार नं. २ यांचे वडील व अर्जदार नं. ३ यांचे सासरे आणि अर्जदार नं. ४ ते अर्जदार नं. ६ यांचे आजोबा कै. शंकर राजाराम शिंदे हे दिनांक ३०/०६/२००० रोजी मयत झालेले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस असले बाबत दाखला मिळणे करीता अर्ज दाखल केलेला आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, कै. शंकर राजाराम शिंदे यांच्या वारसांबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास, ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह या मे. न्यायालयांत दाखल करावी. अन्यथा सदरील अर्जदार हेच कै. शंकर राजाराम शिंदे यांचे कायदेशिर वारस आहेत, असे समजून सदरील अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक ३०/१२/२०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**क. लिपीक**
**दिवाणी न्यायालय,**
**क. स्तर, कर्जत.**

**सही/-**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**क. स्तर, कर्जत.**

### ग्रुप ग्रामपंचायत तिवरे
**ता. कर्जत, जि. रायगड**
**जाहिर निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत तिवरे मधून खालील काम २०२५/२६ या आर्थिक वर्षाकरिता ग्रुप ग्रामपंचायत तिवरे येथील श्री संजय तिखंडे यांच्या घरापासून ते योगेश पाटील यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे निविदा सूचना प्रसिद्ध केली आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्तीसाठी सदर प्रसिद्ध केलेल्या निविदा सूचना/जाहिराती पहाव्यात व विहित मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधी | तरतुद | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| | ग्रुप ग्रामपंचायत तिवरे येथील श्री संजय तिखंडे यांच्या घरापासून ते योगेश पाटील यांच्या घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे. | १.०० लक्ष | १५ वा वित्त आयोग निधी सन २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यानुसार | ६ महिने |
| | | १.०० लक्ष | | |

वर नमूद मंजूर केलेप्रमाणे कामची सिलबंद निविदा दिनांक २६/१२/२०२५ ते १/०१/२०२६ या कालावधीत सकाळी १० ते ५ या वेळेत तिवरे ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारणेत येईल व ०२/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता त्याच दिवशी अथवा इतर सोयीच्या दिवशी सिलबंद निविदा उघडण्यात येईल.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत तिवरे**
**ता. कर्जत जि. रायगड.**

### जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक १) श्री गौतम हिराजी पाटील विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे पावसाळवाडी ; तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे.आर | आकार |
|---|---|---|
| ८५/५ | ०-४९-१० | ४-०३ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण- पाली सुधागड
दि. ३१/१२/२०२५ सही /-

**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
पत्ता-जांभुळपाडा तालुका सुधागड जिल्हा रायगड
मोबाईल नंबर-९१६८८०१०४८

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे वरसोली ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णनाचे बिनशेती मिळकतीचे दोन प्लॉट त्यांच्या विद्यमान मालकांकडून सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध असल्याची खात्री मालकांनी दिलेली आहे.

मिळकतींचे वर्णन

| मौजे | गट क्र. | क्षेत्र (चौ.मि.) | आकार (रू.पै.) | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| वरसोली ता.अलिबाग | ३७/१/अ/२ | बिनशेती २-७०-०० | २७-०० | श्री.सत्यजित गजेंद्र दळी |
| वरसोली ता. अलिबाग | ३७/१/अ/३ | बिनशेती २-७०-०० | २७-०० | श्री.सत्यजित गजेंद्र दळी |

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्युपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक २९/१२/२०२५

**ॲड. महेश एस म्हात्रे**
ऑफीस नं. १, शिवराम भास्कर बिल्डींग,
बाजारपेठ रोड, केळकर नाका, अलिबाग
मो.नं.-९२२६८४७०७७

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स
मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# पीच क्युरेटर ठरतोय 'व्हिलन'

विनायक दळवी

कसोटी क्रिकेट हीच क्रिकेटची खरी शान आहे. परंतु, जेव्हा जेव्हा पाच दिवसांचे सामने अवघ्या दोन दिवसांत किंवा अडीच दिवसात संपतात, त्यावेळी मात्र या कसोटी क्रिकेट बाबत भुवया उंचावल्या जातात. यावेळी ' व्हिलन' असतो तो खेळपट्टी बनविणारा क्युरेटर.

शतकांची परंपरा लाभलेले ॲशेस क्रिकेट ही इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोघांची प्रतिष्ठेची मालिका असते. इंग्लंडमध्ये आणि ऑस्ट्रेलियामध्ये या मालिकेसाठी फक्त दोन्ही देशाचे नाही तर अन्य देशांचे क्रिकेट रसिक देखील प्रतीक्षेत असतात. अशावेळी पाच दिवसांचे सामने किमान साडेतीन दिवस किंवा चार दिवस चालावेत ही मापक अपेक्षा असते. मात्र, यावेळी घडले भलतेच. पर्थ आणि मेलबर्न येथील कसोटी सामना देखील दोन दिवसांतच आटोपला. यावेळी दोन्ही संघांनी मिळून एकूण १४२ षटक गोलंदाजी केली आणि तब्बल ३६ गडी बाद केले. परंतु, एकाही फलंदाजाला अर्धशतक देखील गाठता आले नाही. तसेच, एकाही फिरकी गोलंदाजाला एकही चेंडू टाकण्याची संधी मिळाली नाही. त्यामुळे अवघ्या १४२ षटकांत हा सामना संपला. एवढी षटके होऊन देखील खेळपट्टी हिरवीगार होती. त्यानंतर आणखी कसोटी सामने देखील त्यावर खेळवत आले असते एवढी तंदुरुस्त आणि फिट खेळपट्टी होती.

पर्थ येथील कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलिया क्रिकेट बोर्डाला सामना लवकर संपल्यामुळे तब्बल पाच दशलक्ष डॉलर्सचा फटका बसला होता. आणि मेलबर्न येथील सामन्यात तर जवळजवळ दुप्पट तोटा सोसावा लागला. तसेच, तीन दिवसांचा तिकिटांचा 'रेवेन्यू' बुडाला. फूड आणि अन्य पेय विक्रीसाठी ज्यांनी स्टॉल्स लावले होते त्यांचे नुकसान झाले. कार पार्किंगसाठी अनामत रक्कम भरून ठेका घेणाऱ्यांचे देखील प्रचंड नुकसान झाले. तसेच, क्रिकेट विषयक सामग्री विकणाऱ्या अनेक कंपन्यांचे पैसे बुडाले. पाच दिवसांसाठी तयार करण्यात आलेले 'हॉस्पिटॅलिटी टेन्ट' देखील रिकामे ओस पडले. आणि सर्वात मोठे नुकसान झाले ते ब्रॉडकास्टर्स आणि जाहिरातदारांचे. या मालिकेसाठी अधिक पैसे देऊन त्यांनी 'टाइम स्लॉट' बुक केले होते. त्यांना यावेळी जबरदस्त तोटा सहन करावा लागला.

सध्या क्रिकेट हा केवळ खेळ राहिला नसून तो एक मोठा उद्योग बनला आहे. या उद्योगात सतत तोटा बसला, तर कसोटी क्रिकेटचे भवितव्य देखील धोक्यात येऊ शकते. त्याशिवाय चांगले दर्जेदार क्रिकेट पाच दिवस पाहता येईल या आशेने आलेल्या क्रिकेट रसिकांचाही हिरमोड झाला तो वेगळाच. त्यांचे देखील सीजन तिकिटापैकी तीन दिवसांचे पैसे पाण्यात गेले आहेत. या सर्व गोष्टीला प्रामुख्याने जबाबदार ठरले जाते ते खेळपट्टीला आणि खेळपट्टी तयार करणाऱ्या क्युरेटरला.

मेलबर्न क्रिकेट ग्राउंडचे क्युरेटर मॅट पेज हे आहेत. दोन दिवसानंतर येणाऱ्या उष्ण हवामानाच्या अंदाजामुळे पेज यांनी खेळपट्टीवर ७ मिलिमीटर्स उंची ऐवजी १० मिलिमीटर उंचीचे गवत राखून ठेवले. त्यांना ड्रॉप इन खेळपट्टी उष्णतेमुळे पाटा बनू नये असे वाटत होते. ते योग्यही होते. कारण याच मैदानावर भारताबरोबर झालेल्या गत कसोटीत, त्यांनी ७ मिलिमीटर उंचीचे गवत ठेवले आणि सामना पाचव्या दिवसावर गेला. असे रटाळ क्रिकेट होऊ नये, असे पेज यांना प्रामाणिकपणे वाटले. म्हणून त्यांनी अधिक उंचीचे गवत ठेवले.

क्रिकेटची खेळपट्टी तयार करणे मोठ्या जिकिरीचे काम आहे. उष्ण हवामान, थंड हवामान, पावसात ढग आले किंवा पावसाळी हवामान आले तर खेळपट्टीचे स्वरूप तात्काळ बदलते आणि निकालही बदलतो. एखाद्या 'रेसिपी' सारखे असते. किंचित प्रमाण बदलले तर स्वरूप आणि निकालही बदलतो. ड्रॉप इन खेळपट्टी वापरायला सुरुवात झाल्यापासून ही तारेवरची कसरत क्युरेटरला करावीच लागते. कारण खेळपट्टी तयार करताना देखील पाणी किती सोडायचे, किती ओलसर ठेवायची, किती कोरडी, किती हार्ड, टणक करायची याचा देखील अचूक अंदाज व गणित मांडावे लागते. ते चुकले की संपूर्ण कसोटीचा बट्ट्याबोळ होतो. खरंतर नैसर्गिक खेळपट्ट्या तयार केल्या जात होत्या त्यावेळी असे फारसे घडत नव्हते. मात्र, अशा खेळपट्ट्या तयार करताना यजमान संघाचे कर्णधार, प्रशिक्षक आणि काही ज्येष्ठ खेळाडू खेळपट्टी अधिक कोरडी करण्याचे, गवत कमी ठेवण्यात किंवा जास्त ठेवण्याचा आग्रह क्युरेटरकडे धरतात. मग त्या खेळपट्टीचे संतुलनच बिघडले जाते. भारतात गेल्या दशकापासून असे सर्रासपणे केले जात आहे. मात्र, रवी शास्त्री प्रशिक्षक असताना त्यांच्या संघात खराब खेळपट्टीवर किंवा आखाडा खेळपट्टीवर खेळण्याची क्षमता असलेले फलंदाज होते. आता गौतम गंभीर प्रशिक्षक असलेल्या भारतीय संघाकडे असे कसलेले फलंदाज नाहीत. त्यामुळे आपण प्रति पक्षाला कितीही कमी धावात आपण प्रतिपक्षाला गुंडाळले तरीही आपण त्या अल्प धावसंख्येपर्यंत देखील पोहोचत नाही, हे कटु सत्य आहे. अशा वेळेस सर्वच देशांचे खेळाडू खेळपट्टीला दोष देऊन मोकळे होतात.आयपीएलच्या युगात खेळणाऱ्या भारतीय फलंदाजांकडे अशा खेळपट्ट्यांवर खेळण्याचे तंत्र नाही आणि संयम देखील नाही.

सलग दोन कसोटी दोन दिवसांत संपल्यामुळे क्रिकेट ऑस्ट्रेलिया पुढे आव्हान उभे राहिले आहे. भारतीय क्रिकेट नियमक मंडळाप्रमाणे त्यांची आर्थिक परिस्थिती सुदृढ नाही. तरीही काही गोष्टींशी आणि तत्त्वांची तडजोड करून त्यांना कसोटी क्रिकेट जगवावे लागणार आहे. कारण इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोन देशांनीच आतापर्यंत कसोटी क्रिकेट जिवंत ठेवले आहे. कसोटी क्रिकेटसाठीचा धोका तर पुढे आहे. कारण तडजोड करताना स्पॉन्सर्स आणि पुरस्कर्ते किंवा अन्य काही शक्ती यांच्या आग्रहामुळे कसोटी क्रिकेटचे पावित्र्य टिकेल का? याबाबत देखील नवीन समस्या उद्भवण्याची शक्यता आहे.



# मुंबई, दिल्ली, कर्नाटकची हॅट्ट्रिक

## गोवा, बिहारसह यूपी, एमपीचाही नॉनस्टॉप विजय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

रोहित शर्मा आणि विराट कोहली नसले तरी आज मुंबई आणि दिल्ली यांनी आपली अपराजित हॅट्ट्रिक साजरी केली. तसेच कर्नाटकने तामीळनाडूच्या २८९ धावांचा यशस्वी पाठलाग करताना थरारक आणि सलग तिसऱ्या विजयाची नोंद केली. त्याचप्रमाणे गोवा, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश या संघांनीही आपल्या विजयाची मालिका कायम राखताना विजय हजारे करंडकात विजयी हॅट्ट्रिक साजरी केली.

पहिल्या दोन लढतींप्रमाणे तिसऱ्या लढतीतही वन डेचा जोरदार खेळ पाहायला मिळाला. मुंबईने तिसऱ्या सामन्यातही पहिल्या डावातच आपला विजय निश्चित करताना दुबळ्या छत्तीसगडचा १४४ धावांत डाव गुंडाळला आणि विजयी लक्ष्य २४ व्या षटकांत गाठले. कर्णधार शार्दुल ठाकूरने पहिल्या षटकांतच सलामीवीर अनुज तिवारी आणि मयांक वर्माची विकेट काढत सनसनाटी सुरुवात केली.

ध्रुव जुरेलच्या नाबाद १६० धावांच्या अफलातून शतकी खेळीला कर्णधार रिंकू सिंहच्या अर्धशतकी साथीनंतर गोलंदाजांनी दाखवलेल्या प्रभावी कामगिरीच्या जोरावर उत्तर प्रदेशने बडोद्याचा ५४ धावांनी पराभव केला.

उत्तर प्रदेशकडून अभिषेक गोस्वामी आणि आर्यन जुयाल या सलामी जोडीने दमदार सुरुवात करत पहिल्या विकेटसाठी ७७ धावांची भागीदारी रचली. आर्यन जुयाल बाद झाल्यानंतर ध्रुव जुरेल मैदानात उतरला. अभिषेक गोस्वामीही ५१ धावांवर बाद झाला. त्यानंतर जुरेलने कर्णधार रिंकू सिंहसोबत डाव सावरत चौथ्या विकेटसाठी १४४ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. रिंकू सिंहने ६३ धावांची खेळी केली. अखेरच्या षटकांत जुरेलने आक्रमक फलंदाजी करत १०१ चेंडूंत १५ चौकार आणि आठ षटकारांसह नाबाद १६० धावा ठोकल्या. त्यामुळे उत्तर प्रदेशने ७ बाद ३६९ अशी मजल मारली.

झारखंडच्या ४१३ धावांच्या आव्हानाचा जबरदस्त पाठलाग करत आपले विजयी अभियान सुरू करणाऱ्या कर्नाटकने दुसऱ्या सामन्यात केरळच्या २८५ धावांचे आव्हानही सहज पार पाडले होते तर आज तामीळनाडूच्या २८९ धावांना १७ चेंडू आधीच गाठले. कर्नाटकच्या डावात कर्णधार मयंक अगरवाल, कृष्णन श्रीजीत आणि श्रेयस गोपाल यांनी धमाकेदार कामगिरी केली.

डेगा निश्चल (१८२) आणि सेदेजहाली रुपेरो (१२४) यांच्या शतकी खेळीच्या जोरावर नागालॅण्डने विजय हजारे ट्रॉफी प्लेट गटातील सामन्यात मिझोरमचा १७७ धावांनी पराभव केला. नागालॅण्डने ५० षटकांत ४ बाद ३९९ धावा केल्या. प्रत्युत्तरात मिझोरमचा डाव ४२ षटकांत २२२ धावांत आटोपला. साहिल रझाने झुंजार खेळी केली, मात्र इमलिवती लेमतुर आणि अकावी येप्थो यांच्या प्रत्येकी तीन विकेटमुळे मिझोरमला पराभव स्वीकारावा लागला.



### दिल्लीचा निसटता विजय

सौराष्ट्रने विश्वराज जाडेजा (११५) आणि रुचित अहिरच्या ६७ चेंडूंतील ७ चौकार आणि ५ षटकारांच्या जोरावर ठोकलेल्या ९५ धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर ७ बाद ३२० अशी दमदार मजल मारली होती. या धावांचा पाठलाग करताना दिल्लीने २४८ धावांत आपले सहा फलंदाज गमावले होते. त्यामुळे सौराष्ट्रने सामन्यात आघाडी घेतली होती. तेव्हा गोलंदाजीत चमक दाखवणाऱ्या नवदीप सैनीने (ना. ३४) हर्ष त्यागीच्या (४९) जोडीने सातव्या विकेटसाठी ६९ धावांची भागी रचत दिल्लीचा विजय सोप्पा केला. विजयापासून ४ धावा दूर असताना त्यागी बाद झाला. पण पुढे सैनीने छत्तीसगडला जास्त संघर्ष करू दिले नाही. ४१ धावांत ३ विकेट आणि ३४ चेंडूंची नाबाद खेळी करणारा सैनी दिल्लीच्या विजयाचा शिल्पकार ठरला. दिल्लीच्या डावात प्रियांश आर्य (७८) आणि तेजस्वी दहिया (५३) यांनीही मोलाची भूमिका निभावली.

### विदर्भचा विजय, महाराष्ट्राचा पराभव

जम्मू-कश्मीरने विदर्भसमोर ९ बाद ३११ अशी जोरदार धावसंख्या उभारली होती. त्यानंतर अमन मोखाडे (१३९) आणि रविकुमार समर्थ (११४) यांनी वैयक्तिक शतकासह तिसऱ्या विकेटसाठी २१८ धावांची भागी रचत विदर्भला विजयपथावर नेले. विदर्भने हा सामना ९ चेंडू आणि ५ विकेट राखून जिंकला. मात्र महाराष्ट्राच्या संघाला हिमाचल प्रदेशकडून अवघ्या ७ धावांनी हार सहन करावी लागली. पुखराज मानच्या ११० धावांच्या खेळीमुळे हिमाचलने २७१ धावा केल्या होत्या तर महाराष्ट्राचा डाव ५० षटकांत २६४ धावांपर्यंतच मजल मारू शकला. अंकित बावणेने ९७ धावांची खेळी करत महाराष्ट्राला विजयाची संधी निर्माण केली होती. मात्र मधल्या फळीतील फलंदाजांच्या निराशाजनक कामगिरीने महाराष्ट्राला दुसरा पराभव सहन करावा लागला.
तसेच मध्य प्रदेशने सलग तिसरा विजय मिळवताना केरळचा ४७ धावांनी पराभव केला. त्यांचा संघ २१४ धावांतच आटोपला होता, पण मध्य प्रदेशच्या गोलंदाजांनी केरळचा डाव १६७ धावांतच संपवला. बिहारने विजयाची हॅट्ट्रिक साजरी करताना मेघालयाला ९ बाद २१७ धावांवर रोखत विजयी लक्ष्य ३३ व्या षटकातच गाठले. पियुष सिंग (१००) आणि आकाश राज (७५) यांनी धुवाधार फलंदाजी करत बिहारला आणखी एक विजय मिळवून दिला.

## हंपी, एरीगेसीला ब्राँझपदक

### जागतिक जलद बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा

**नवी दिल्ली:** कोनेरू हंपी हिने महिला विभागात, तर अर्जुन एरीगेसी याने खुल्या विभागात जागतिक जलद बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत ब्राँझपदक पटकावण्याची किमया करून दाखवली. मॅग्नस कार्लसन याने खुल्या गटात विजेता होण्याचा मान संपादन केला. रशियाच्या व्लादिस्लाव अर्टेममिएव याने दुसरा क्रमांक मिळवला. भारताच्या अर्जुन एरीगेसी याने तिसरा क्रमांक मिळवताना ब्राँझपदक आपल्या नावावर केले. जलद जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत पदक पटकावणारा अर्जुन एरीगेसी हा विश्वनाथन आनंद यांच्यानंतरचा दुसरा भारतीय खेळाडू ठरला. कोनेरू हंपी हिच्या शिरपेचातही मानाचा तुरा खोवला गेला आहे.

## महाराष्ट्र यार्टिंग असोसिएशनची राज्यस्तरीय स्पर्धा

# प्रतिभावान खलाशांचा लागला कस

**। उरण । प्रतिनिधी ।**

दांडा समुद्रकिनाऱ्यावर महाराष्ट्र यार्टिंग असोसिएशनने नुकतेच हिवाळी प्रशिक्षण शिबीर यशस्वीरित्या पूर्ण केले. बहुप्रतिक्षित राज्यस्तरीय स्पर्धा उरणच्या दांडा समुद्रकिनाऱ्यावर पूर्ण उत्साहात सुरू करण्यात आली.

या दोन्ही कार्यक्रमांमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक प्रतिभावान खलाशांनी सहभाग घेतला आहे. ज्यामुळे कौशल्य विकास आणि स्पर्धात्मक नौकानयनासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

भविष्यातील विजेत्यांसह पाच दिवसांच्या हिवाळी शिबिरात तरुण आणि अनुभवी सहभागींनी तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या नौकानयन तंत्रांवर, सागरी ज्ञानावर आणि शारीरिक तंदुरुस्तीवर लक्ष केंद्रित केले. या गहन प्रशिक्षणाने राज्यस्तरीय स्पर्धेसाठी उत्तम तयारी करून घेतली, ज्यामुळे महाराष्ट्रातील यार्टिंग प्रतिभा उच्च स्तरावर स्पर्धा करण्यास सज्ज झाली आहे.

सध्या सुरू असलेली राज्यस्तरीय स्पर्धा, ऑप्टिमिस्ट आणि टेक्नो २९३ या लोकप्रिय वर्गांसह विविध श्रेणींमध्ये रोमांचक शर्यतींची साक्षीदार आहे. राज्य क्रमवारी सुधारू पाहणाऱ्या आणि राष्ट्रीय स्पर्धांसाठी पात्र होऊ इच्छिणाऱ्या खलाशांसाठी ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची आहे. तिसऱ्या दिवसाच्या अखेरपर्यंत, स्पर्धा अत्यंत चुरशीची राहिली.

दुसऱ्या दिवसाचे निकाल मजबूत कामगिरी आणि ताफ्यातील अटीतटीच्या लढाया दर्शवतात. तात्पुरते आघाडीवर असलेले आणि दावेदार असलेले खलाशी टेक्नो २९३ वर्ग ज्योत्स्ना क्रिश रे आणि प्रणोती पाटील यांसारख्या खलाशी उत्कृष्ट डावपेचात्मक कौशल्ये दाखवत आहेत आणि एका स्पर्धात्मक गटाचे नेतृत्व करत आहेत.

ऑप्टिमिस्ट पुरुष वर्ग व्यास शेलार आणि अमन शेख यांसारखे खलाशी अव्वल स्थानासाठी लढत असल्याने क्रमवारीमध्ये मोठी स्पर्धा आहे.

ऑप्टिमिस्ट सिल्व्हर वर्ग महिला खलाशी जोरदार लढा देत आहेत, ज्यात राशी गाईकर उत्कृष्ट कामगिरी करीत आहे.पुढील दोन दिवसांच्या शर्यतीमध्ये खलाशी प्रतिष्ठित विजेतेपदांसाठी लढणार आहेत.

खलाशांनी उरण तालुक्यातील दांडा समुद्रकिनाऱ्यावरील सागरी आव्हाने खऱ्या अर्थाने स्वीकारली आहेत आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी त्यांची तयारी सिद्ध केली आहे.

## पेण येथे कराटे बेल्ट परीक्षा संपन्न



**। खरोशी । प्रतिनिधी ।**

पेण येथे युनायटेड शोतोकान कराटे असोशिएशन इंडिया या संस्थेच्या वतीने पेण येथील नगरपालिका मैदानात यलो बेल्ट ते ब्लॅक ब्राऊन बेल्ट पर्यंतच्या विद्यार्थ्यांची बेल्टपरीक्षा घेण्यात आली.

यामध्ये ९८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.सदरची परीक्षा युनाइटेडचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर, उपाध्यक्ष रविंद्र म्हात्रे यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

यावेळी मुख्य परिक्षक ओसेन्साय विनायक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सेन्साय निलेश ओव्हाळ प्राजक्ता तेटमे अयुष पाटील, स्वरांगी घैसास, रितुल म्हात्रे, हर्षाली पेणकर, महमद अली, अयुष रसाळ, अयेशा बेगम, भक्ती भानुसकर, रितेष पवार, दिपेश जाधव, पार्थ निकम, ओजस म्हात्रे, आर्यन म्हात्रे ह्यांनी परिक्षक म्हणून काम पाहीले सर्व बेल्ट परिक्षेत उतिर्ण झालेल्या विद्यार्थाना बेल्ट व सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले व शुभेच्छा देण्यात आल्या.

## दिघेवाडी महिला कबड्डी स्पर्धेत

# भिल्लेश्वर किहीम प्रथम



**पाली/गोमाशी :** नांदगाव पंचक्रोशीतील दिघेवाडी येथे प्रथमताच भव्यदिव्य जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील नामवंत महिला कबड्डी संघ सहभागी झाले होते.

या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचा मानकरी भिल्लेश्वर किहीम हा संघ ठरला या संघास रोख रक्कम ११००१ व आकर्षक चषक, द्वितीय क्रमांक कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल या संघास रोख रक्कम ७००१ व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक दत्तात्रेय क्रीडा मंडळ पनवेल आणि चतुर्थ क्रमांक सुवर्ण गणेश दिवेआगर या दोन्ही संघास प्रत्येकी रोख रक्कम ५००१ व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट खेळाडू चैताली म्हात्रे, उत्कृष्ट चढाई ममता चव्हाण, उत्कृष्ट पकड पूजा ,पब्लिक हिरो सिया काळे या खेळाडूंना आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेचे समालोचन संजय थळे यांनी केले.

## मेलबर्नच्या खेळपट्टीला खराब रेटिंग

**मेलबर्न :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदने मेलबर्न क्रिकेट ग्राउंडला खराब रेटिंग दिली आहे. तर, पर्थच्या खेळपट्टीला व्हेरी गुड रेटिंग मिळाली आहे. सामना रेफरी जेफ यांच्या अहवालानुसार, मेलबर्नला शिक्षेच्या स्वरूपात एक डिमेरिट पॉइंट दिला आहे. २०२३ मध्ये नवीन खेळपट्टी ग्रेडिंग प्रणाली लागू झाल्यानंतर, पहिल्यांदाच कोणत्याही ऑस्ट्रेलियन मैदानावर कारवाई झाली आहे.

बॉक्सिंग डे कसोटी २ दिवसांत संपल्यानंतर माजी क्रिकेटपटूंनी मेलबर्न क्रिकेट ग्राउंडच्या खेळपट्टीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. इंग्लंडचे माजी कर्णधार केविन पीटरसन, मायकल वॉन, दिनेश कार्तिक यांनी खेळपट्टीवर तीव्र टीका केली होती.

# विराट कोहलीचे सरावाला प्राधान्य

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

विराट कोहली व त्याचा व्यावसायिकपणा सर्वश्रुत आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेआधी आपला फलंदाजी फॉर्म कायम राहावा यासाठी त्याने विजय हजारे करंडकातील आणखी एका सामन्यात खेळण्याला प्राधान्य दिले आहे.

दिल्ली क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहन जेटली यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, विराट कोहली दिल्ली संघासाठी विजय हजारे करंडकातील तिसरा सामना खेळणार आहे.बीसीसीआयकडून भारतीय संघातील खेळाडूंना विजय हजारे करंडकातील किमान दोन लढती खेळणे अनिवार्य करण्यात आले. यानंतर भारतीय संघातील सर्वच खेळाडू विजय हजारे करंडकात खेळताना दिसत आहेत.



विराट कोहली याने पहिल्या दोन लढतींमध्ये दिल्ली संघाचे प्रतिनिधित्व केले. या दोन लढतींत त्याने अनुक्रमे १३१ धावा व ७७ धावा केल्या. या दोन्ही लढतींत त्याने चमकदार खेळ केला. याचसोबत त्याने ३३० डावांमध्ये लिस्ट ए क्रिकेटमधील १६ हजार धावांचा टप्पाही ओलांडला.विराट कोहली विजय हजारे करंडकातील ६ जानेवारी रोजी होत असलेल्या रेल्वेविरुद्धच्या लढतीत दिल्ली संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे. ही लढत खेळून झाल्यानंतर तो न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेसाठी रवाना होईल.

भारत-न्यूझीलंड यांच्यामधील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेला ११ जानेवारीपासून सुरुवात होत आहे. या मालिकेसाठी भारतीय खेळाडू ८ जानेवारीला बडोदे येथे एकत्रित येणार आहेत. विराट कोहली त्याआधीच तेथे पोहोचणार असून, सराव करणार आहे. हार्दिक, जसप्रीतला विश्रांती बीसीसीआयच्या संघ व्यवस्थापनाकडून जसप्रीत बुमरा व हार्दिक पंड्या या दोन खेळाडूंना विश्रांती देण्यात आलेली आहे. भारत व श्रीलंका या देशांमध्ये पुढल्या वर्षी टी-२० विश्वकरंडकाचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामुळे त्याआधी दोन खेळाडूंना विश्रांती देण्यात आलेली आहे.

## रायगडच्या मुलींनी मारली बाजी



**पोयनाड :** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकोणीस वर्षाखालील मुलींच्या एकदिवसीय ५० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेला सुरुवात करण्यात आली आहे. रायगडच्या मुलींच्या संघाचा सामना बास क्रिकेट अकॅडमी पुणे संघाबरोबर झाला त्यामध्ये रायगडच्या संघानी बास क्रिकेट अकॅडमी पुणे संघांचा ११५ धावांनी पराभव करत स्पर्धेला विजयाने सुरुवात केली आहे. प्रथम फलंदाजी करताना रायगडच्या मुलींच्या संघाने ४९ षटकांमध्ये ६ गडी गमावत १९८ धावा काढल्या त्यामध्ये भ्रताती राय हिने सर्वाधिक ३६ स्वरा बामगुडे ३४ तर संस्कृती पालकर हिने २८ धावांचे योगदान संघाला दिले.

### केवळ ४४ गोल करण्याची गरज | ९५६ गोल करून जगात अव्वलस्थानी

# रोनाल्डोचे एक हजार गोल करण्याचे ध्येय

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

पोर्तुगालचा महान खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डो याला फुटबॉलच्या रणांगणात एक हजार गोल करावयाचे आहेत. हेच ध्येय त्याने आगामी काळात डोळ्यांसमोर ठेवले आहे. ख्रिस्तियानो रोनाल्डो याने आपले ध्येय दुबई येथील ग्लोब सॉकर पुरस्कार सोहळ्याप्रसंगी बोलून दाखवले.

ख्रिस्तियानो रोनाल्डो हा सध्या अल नसार या क्लबमधून खेळत आहे. सौदी प्रो लीग या फुटबॉल स्पर्धेमध्ये तो या क्लबचे प्रतिनिधित्व करीत आहे. शनिवारी झालेल्या लढतीत त्याने दोन गोल केले. याचसह त्याने आपल्या कारकिर्दीतील गोलांची संख्या ९५६ वर नेली. आता एक हजार गोल करण्यासाठी त्याला आणखी ४४ गोल करावे लागणार आहेत.



दुबई येथील पुरस्कार सोहळ्यामध्ये ख्रिस्तियानो रोनाल्डो याची मिडल इस्ट या विभागातील सर्वोत्तम फुटबॉलपटू म्हणून निवड करण्यात आली. याप्रसंगी त्याने विश्वास व्यक्त करताना म्हटले की, माझी कारकीर्द संपवण्याआधी एक हजार गोल करावयाचे आहेत. दुखापतीला दूर ठेवल्यास मला माझे लक्ष्य गाठता येणार आहे.

ख्रिस्तियानो रोनाल्डो याने आपल्या मनातील भावना व्यक्त केल्या. तो म्हणाला की, मी मिडल इस्टमध्ये खेळत असलो किंवा युरोपमध्ये खेळत असलो किंवा इतरत्र कुठेही खेळत असलो, मी फुटबॉल खेळण्याचा आनंद घेत असतो. मला अधिकाधिक करंडक जिंकावयाचे आहेत. माझे लक्ष्य एक हजार गोल करण्याचे आहे. मी यापुढेही खेळत राहणार आहे.

ख्रिस्तियानो रोनाल्डो याचे सध्याचे वय ४० आहे. पुढील वर्षी अमेरिका, कॅनडा व मेक्सिको येथे फुटबॉल विश्वकरंडक होणार आहे. तोपर्यंत ख्रिस्तियानो रोनाल्डो ४१ वर्षांचा होणार आहे. वयाच्या ४१व्या वर्षीही तो आंतरराष्ट्रीय फुटबॉल लढत खेळण्यासाठी सज्ज होत आहे. ही बाब लक्षणीय आहे.

ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या पोर्तुगाल संघाचा विश्वकरंडकासाठी के गटात समावेश करण्यात आला आहे. या गटामध्ये पोर्तुगाल या देशासह उझबेकिस्तान व कोलंबिया या देशांसह पात्रता फेरीतील आणखी एका देशाचा समावेश आहे.

फुटबॉल जगतामध्ये सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत ख्रिस्तियानो रोनाल्डो व लियोनेल मेस्सी हे खेळाडू पहिल्या दोन क्रमांकावर आहेत. ख्रिस्तियानो रोनाल्डो याने ९५६ गोल करीत पहिला क्रमांक पटकावला आहे. अर्जेंटिनाचा लियोनेल मेस्सी याने ८९६ गोलांसह दुसरे स्थान मिळवले आहे. ब्राझीलचे महान दिवंगत खेळाडू पेले ७६२ गोलांसह तिसऱ्या स्थानावर आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)